# एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेची तिसरी यादी जाहीर


दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे अंक -५२ मंगळवार दि.२९ ऑक्टोबर २०२४ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed Daily Marathi Year-5th Issue-52 Tuesday, Dt.29 October 2024 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4


मुंबई : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून उमेदवारांची तिसरी यादी जाहीर करण्यात आलेली आहे. तिसऱ्या यादीत सेनेचे १३ उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. दोन जागी मित्रपक्षांच्या उमेदवारांना पाठिंबा जाहीर करण्यात आलेला आहे. विशेष बाब म्हणजे रावसाहेब दानवे यांच्या कन्या संजना जाधव, भाजपच्या शायना एनसी यांचं सेनेच्या तिसऱ्या यादीत आलं आहे. बार्शीचे अपक्ष आमदार राजेंद्र राऊत यांना देखील उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे उमेदवार
सिंदखेड राजा - शशिकांत खेडेकर
घनसावंगी- हिकमत उढाण
कन्नड- संजना जाधव
कल्याण ग्रामीण- राजेश मोरे

(उर्वरीत पान २ वर)

# आ.संदीप क्षीरसागरांचा उमेदवारी अर्ज दाखल

## महापुरूषांना अभिवादन करून साध्या पद्धतीने अर्ज केला दाखल






बीड(प्रतिनिधी):- बीड विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार असलेले संदीप क्षीरसागर यांनी सोमवारी (दि.२८) रोजी अगदी साध्या पद्धतीने सर्व महापुरुषांना अभिवादन करून, बीड शहरातील देवस्थानांचे दर्शन घेऊन आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

बीड विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार संदीप क्षीरसागर यांना दुसर्यांदा विधानसभा निवडणुकीत संधी मिळाली आहे. आ.संदीप क्षीरसागर यांनी सोमवारी (दि.२८) रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार), भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) व मित्र पक्षांच्या महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार म्हणून आपला अर्ज अगदी साध्या पद्धतीने दाखल केला. सर्वप्रथम आपल्या नवगण रखजूरी गावचे ग्रामदैवत श्री मंगलमूर्ती देवस्थान येथे दर्शन घेतले. त्यानंतर आपल्या आई स्व.रेखाताई क्षीरसागर, त्यांच्या राजकीय गुरू असलेल्या त्यांच्या आजी स्व.केशरकाकू व नाना तसेच बीड जिल्ह्याचे भूमिपूत्र दिवंगत स्व.विनायकराव मेटे साहेब यांच्या समाधीचे दर्शन घेतले. त्यानंतर बीड शहरातील देवस्थान श्री कनकालेश्वर, हजरत शहेंशाहवली दर्गा, हजरत मन्सूर शाहवली दर्गा, श्री शनि मंदीर येथील दर्शन घेतले. त्यानंतर आ.क्षीरसागर यांनी शहरातील माँसाहेब जिजाऊ, जाणते राजे छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीसुर्य महात्मा फुले, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले, राष्ट्रसंत भगवान बाबा, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, छत्रपती शाहू महाराज, लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे, महात्मा बसवेश्वर, राष्ट्रपिता महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, राष्ट्रसंत गाडगेबाबा, शिवरत्न जिवाजी महाले, महाराष्ट्रातील कृषी क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक साहेब, स्व.द्वारकादास मंत्री साहेब यांना आ.संदीप क्षीरसागर यांनी अभिवादन केले.

दरम्यान सर्व महापुरुषांना अभिवादन केल्यानंतर आ.क्षीरसागर यांनी, बीड विधानसभा मतदारसंघ निवडणुक निर्णय अधिकारी यांच्याकडे जाऊन आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी खा.बजरंग बप्पा सोनवणे, माजी आ.सय्यद सलीम, माजी आ.उषाताई दराडे उपस्थित होते.






# मागील पाच वर्षात सातत्यपूर्ण जनसंपर्क ठेवून प्रामाणिकपणे विकासकामे केली - आ. नमिता अक्षय मुंदडा

## भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, एसआयपी व इतर मित्र पक्षाच्या अधिकृत उमेदवार आ. नमिता अक्षय मुंदडा यांनी केला अर्ज दाखल

**प्रतिनिधी** । अंबाजोगाई

भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, एसआयपी व इतर मित्र पक्ष महायुतीच्या अधिकृत उमेदवार आ. नमिता अक्षय मुंदडा यांनी सोमवार, दिनांक २८ ऑक्टोबर रोजी केज तहसील कार्यालयात सहकाऱ्यांसह जाऊन अत्यंत साध्या पद्धतीने आपला २३२ केज विधानसभा मतदारसंघ निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला.

प्रारंभी केज विधानसभा मतदारसंघासाठी भाजप - महायुतीतर्फे उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी सोमवारी सकाळी लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे यांच्या गोपीनाथ गड (परळी वैजनाथ) या स्मृतीस्थळी नतमस्तक होत अभिवादन केले. तसेच उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी केज विधानसभा मतदारसंघाच्या भाग्यविधात्या स्वर्गीय डॉ.विमलताई मुंदडा यांच्या चनई (अंबाजोगाई) येथील स्मृतिस्थळी नतमस्तक होत अभिवादन केले. केज तहसील कार्यालयात सहकाऱ्यांसह जाऊन अत्यंत साध्या पद्धतीने आपला २३२ केज विधानसभा मतदारसंघ निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी आ. नमिता अक्षय मुंदडा यांच्यासोबत ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, युवा नेते अक्षय मुंदडा, भाजपाचे राज्य



प्रवक्ते राम कुलकर्णी, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे जिल्हाध्यक्ष ऍड.राजेश्वर चव्हाण आदींसह महायुतीतील घटक पक्षाचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलताना आ. नमिता अक्षय मुंदडा यांनी सांगितले की, आशीर्वाद जनतेचा, आणि वसा केज विधानसभेच्या प्रगतीचा घेऊन आम्ही काम करीत आहोत. भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, आरपीआय (ए), एसआरपी व इतर मित्र पक्ष महायुतीच्या २३२ केज

(उर्वरीत पान २ वर)








## जरांगे पाटलांचे सहकारी गंगाधर काळकुटेंचा ही उमेदवारी अर्ज केला दाखल

**प्रतिनिधी** । बीड

मनोज जरांगे पाटील यांचे खंदे समर्थक आणि विश्वासु समजले जाणारे गंगाधर काळकुटे पाटील यांनी बीडमधुन विधानसभा लढवण्यासाठी आज अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.यावेळी त्यांच्यासोबत जरांगे पाटलांच्या तब्बल ११ शिलेदारांनी एकत्रित उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. यामुळे राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त केले जात आहे.असे असले तरी मात्र जरांगे

(उर्वरीत पान २ वर)

## संपादकीय

# आधार पुन्हा 'निराधार'

'सेंट्रल युनिक आयडेंटिफिकेशन डेटा बेस' म्हणजेच भारतीय नागरिकत्वाची एकमात्र ओळख या अर्थाने आधार कार्ड विकसित करण्यात आले. बायोमेट्रिक म्हणजेच जैविक मोजमापांच्या आधारावर ओळख सत्यापित करणारी ही यंत्रणा तशी रुळली आहे.

जगातील सर्वांत मोठी बायोमेट्रिक व्यक्तिपरिचय योजना असलेल्या आधार प्रमाणपत्राला जन्मतारखेचा दाखला समजता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. रस्ते अपघातात प्राण गमावलेल्या व्यक्तीचे वय ठरविण्यासाठी आधार कार्डाचा निकष मानता येईल, असा निकाल पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचा दिला होता. सर्वोच्च न्यायालयाने आता हा आदेश रद्दबातल ठरविल्यामुळे 'आधार' या बहुउद्देशीय प्रमाणपत्राच्या सर्वगामी उपयोजनाबद्दल शंका निर्माण झाली आहे. या निकालाचा दूरगामी परिणाम होईल. कोर्टाच्या या निर्वाळ्यामुळे संबंधित व्यक्तीच्या नातलगांना न्याय मिळाला. मात्र, आधार कार्डाच्या उपयोगितेबद्दलची संदिग्धता कायम असल्याचे पुन्हा स्पष्ट झाले.

'सेंट्रल युनिक आयडेंटिफिकेशन डेटा बेस' म्हणजेच भारतीय नागरिकत्वाची एकमात्र ओळख या अर्थाने आधार कार्ड विकसित करण्यात आले. बायोमेट्रिक म्हणजेच जैविक मोजमापांच्या आधारावर ओळख सत्यापित करणारी ही यंत्रणा तशी रुळली आहे. बायोमेट्रिक प्रणालीच्या माध्यमातून बोटांचे ठसे, चेहऱ्याची प्रतिमा, बुबुळ आदींद्वारे स्वयंचलित उपकरणांच्या साहाय्याने जिवंत व्यक्तीची ओळख सिद्ध केली जाते. देशभरातील व्यक्तींचा अधिकृत आणि प्रमाणित दस्तावेज म्हणून आधार कार्डाकडे बघितले गेले. नागरिकांना महत्त्वाच्या सरकारी कामांसाठी शिधापत्रक, वाहनचालक परवाना किंवा पासपोर्टचा वापर करावा लागतो. अलीकडे वैयक्तिक करप्रणाली, मोबाइल सीमकार्ड, पेन्शन योजना, रेशन तसेच स्थावर खरेदी-विक्रीत बँक खात्यांसोबत आधार कार्डाची जुळवणी सक्तीची आहे. एवढ्या महत्त्वाच्या कामांसाठी उपयोगात आणले जाणारे 'प्रमाणपत्र' जन्मतारखेचा पुरावा म्हणून ग्राह्य धरता येणार नाही, असा निर्णय आल्याने या ओळख क्रमांकांना 'निराधार' ठरविणे आणि त्याच्या उपयुक्ततेची उलटसुलट चर्चा होणे स्वाभाविक आहे.

## नाहरकत

मौजे घनसावंगी शिवारातील गट क्रं ३०१ मधील देणार विजय उत्तम राठोड यांची दोन एकर (८० आर) जमीन विक्रीचा करार असून दोन एकर (८० आर) जमीन घेणार रमेश सोपान मोहिते मु.मोतीगव्हाण पो.मानेगाव यांच्याशी झाला असून या जमीन खरेदीविक्री व्यवहारात हरकत असल्यास ७ दिवसाच्या आत कागदपत्रासह पुरावा सादर करावा नसता कसल्याही प्रकारची हरकत गृहीत धरले जाणार नाही याची नोंद घ्यावी

## टिसी हरवली आहे

संत रामदास कॉलेज चे विद्यार्थी ज्ञानेश्वर चेत्रभुज सपाटे रा.राजेगाव ता.घनसावंगी जि.जालना या नावाची इयत्ता बारावी पास ची टिसी व काही महत्त्वाचे शैक्षणिक कागदपत्रे घनसावंगी ते जालना प्रवासादरम्यान हरवली आहे.टिसी व काही महत्वाचे शैक्षणिक कागदपत्रे कोणालाही सापडल्यास खाली दिलेल्या मो.नंबर वर संपर्क साधावा ९३५६८८०९९८

# वृक्षतोडी प्रमाणेच वनविभागाचे आचारसंहितेकडे दुर्लक्ष

## मोरदरा येथील वनपर्यटन कामांचा भुमिपुजन फलक उघडाच ; तक्रारी नंतर वनविभागाला जाग आली आणि फलक झाकला :- डॉ.गणेश ढवळे

**प्रतिनिधी । बीड**

निष्पक्ष निवडणुका घेण्यासाठी निवडणूक आयोगाने काही नियम बनवले आहेत.निवडणुक आयोगाच्या या नियमांना आचारसंहिता म्हणतात. निवडणुकी दरम्यान या नियमांचे पालन करणे ही सरकार, नेते आणि राजकीय पक्षांची जबाबदारी असते. आयोगाने निवडणुक कार्यक्रम जाहीर करताच आचारसंहिता लागू होते.निवडणुक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आचारसंहितेच्या नियमांचे पालन करणे बंधनकारक असते.

याच कालावधीत सरकारी घोषणा, पायाभरणी किंवा उद्घाटन समारंभ होत नाहीत.तसेच राजकीय नेते यांनी केलेल्या शासकीय कामांच्या भुमिपुजन अथवा उद्घाटन यांचे दर्शनी भागात असणारे फलक कपड्यांनी अथवा ईतर कोणत्याही आवरणाने झाकुन टाकणे बंधनकारक असते.मात्र वनविभागातील अधिकारी यांना याचे गांभीर्य नसुन बीड तालुक्यातील कोळवाडी येथील सुप्रसिध्द महादेवाचे पुरातन मंदिर आणि संत गंगाभारती महाराज यांची समाधी असणारे तपोवन आणि मोरांच्या वास्तव्यामुळे मोरदरा नाव पडलेल्या पर्यटन स्थळी अगदी दर्शनी भागात वनविभाग बीड यांच्या मार्फत विविध वनपर्यटन विकासकामांचे भुमिपुजन सोहळा फलक उघडाच असुन त्यावर ना.पंकजाताई मुंढे ( मंत्री ग्रामविकास , महिला व बालविकास , महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री बीड, कार्यक्रमाचे अध्यक्ष रमेशभाऊ पोकळे , सदस्य जिल्हा नियोजन समिती बीड या लोकप्रतिनिधींची नावे ठळक दिसत आहेत. या ठिकाणी रविवारी पर्यटन स्थळ आणि सोमवारी महादेवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची गर्दी असते.आज दि.२७ रविवार रोजी बीड येथील गुरूकुल शाळेच्या मुलांची सहल आली होती. मंदिराच्या पायथ्याशी पाय-या चढतानाच दर्शनी भागात फलक असल्याने सर्वांचेच लक्ष याकडे जात असुन बीड जिल्ह्यातील वृक्षतोडीकडे दुर्लक्ष करणाऱ्या वनविभागाने आदर्श आचारसंहितेकडे सुद्धा दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे.आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होत असुन संबंधित प्रकरणात जबाबदार वन आधिका-यांवर निवडणूक आयोगाने कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.



१५ ऑक्टोबर रोजी विधानसभा निवडणूक अनुषंगाने आचारसंहिता लागलेली असून काल दि. २७ रविवार रोजी पर्यंत फलक झाकलेला नव्हता.काल डॉ .गणेश ढवळे यांनी जिल्हाधिकारी यांना आचारसंहिता उल्लंघनाची तक्रार केल्यानंतर अखेर दुसऱ्या दिवशी आज वनविभागातील आधिका-यांना जाग आली असुन पहाटे फलक कपड्यांने झाकुन त्याचे फोटो मला पाठवले आहेत. तक्रारीनंतर आणि विविध दैनिकात बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर वनविभागातील आधिका-यांना जाग येण्याऐवजी त्यांनी अगोदरच दक्ष राहायला हवे.अशी प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केली.

# माजी आमदार ॲड. निवृत्तीराव उगले यांचे निधन

आष्टी - (प्रतिनिधी)आष्टी, पाटोदा विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार ड. निवृत्तीराव उगले (वय ९५ ) यांचे आज सोमवार दि.२८ आँक्टोबर रोजी पहाटे निधन झाले. १९६७ ते १९७२ याकाळात या मतदार संघाचे आमदार होते तर १९७४ ते १९८० या काळात ते विधान परिषदेचे आमदार राहिले. कडा सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन, भूविकास बँकेचे संचालक यासह अन्य शासनाच्या विविध समितीवर त्यांनी काम पाहिले. अत्यंत शांत, संयमी आणि मितभाषी अशी त्यांची ओळख होती. आष्टी नागरी सह. पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन तथा आष्टी तालुका डाक्टर असो. चे तालुकाध्यक्ष डा. विलासराव सोनवणे यांचे माजी आ. उगले हे सासरे आहेत. आष्टी नागरी पतसंस्थेचे ते जेष्ठ संचालक व मार्गदर्शक होते. सोमवार दि.२८ आँक्टोबर रोजी दुपारी १ वाजता आष्टी बसस्थानक जवळ वैकुंठधामात अंत्यविधी झाला. यावेळी माजी आ.भीमराव धोंडे, अमितजी घावटे साहेब , राष्ट्रवादीचे उमेदवार शेख महेबुब, ड. चंद्रकांत आजबे, माजी न्यायाधीश वसंतराव पोकळे, नायब तहसिलदार बाळदत्त मोरे, अनंत हंबर्डे, ड. नरसिंह जाधव, सतिषआबा शिंदे, नियामत बेग, विजय गोल्हार, बलभीमराव सुंबरे, ड. साहेबराव म्हस्के, संतोषशेठ मेहेर, ड. बाबुराव अनारसे, डा. मधुकर हंबर्डे, अशोक साळवे, आण्णासाहेब चौधरी, किशोर हंबर्डे, प्रा. ढुबे, डा. आर. के. सानप, सागर आमले, सुखलाल मुथा, चेअरमन बाळासाहेब शिंदे, ईकबाल पेंटर, बबनदादा शिंदे, बबनराव खंडागळे, प्राचार्य डा. सोपान निंबोरे, छानबाई ढोबळे, वकील संघाचे अध्यक्ष अजय जेवे, अंकुश चव्हाण, नगरसेवक ज्ञानदेव राऊत, भीमराव गुरव, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, ड. कांतीलाल गव्हाणे, ड. आर. टी. जगताप, राकेश हंबर्डे, बाळासाहेब झांबरे, महालिंग निकाळजे, विठ्ठलराव मुटकुळे, बाळासाहेब शेंदुरकर, काकासाहेब पोकळे, प्रशांत पोकळे, संभाजी काकडे, आनंद शेलार, घनशाम खलासे, अविनाश निंबाळकर पतसंस्थेचे सर्व कर्मचारी वृंदआदि सामाजिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



# परळी विधानसभा निवडणूक;३४ उमेदवारी अर्ज दाखल

**प्रतिनिधी । परळी**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या बिगुल वाजलेला असून उमेदवारी अर्ज भरण्याची शेवट उद्या शेवटची तारीख आहे आणि आज एक दिवस अगोदर परळी विधानसभा मतदारसंघासाठी २९ उमेदवारांनी आपल्या उमेदवारी अर्ज दाखल केला आहे आणि आतापर्यंत एकूण ३४ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केलं आहे आज दाखल केलेल्या २९ उमेदवारी मध्ये राजाभाऊ फड यांनी दोन उमेदवारी अर्ज दाखल केले आहे, महाविकास आघाडी कडून राजेसाहेब देशमुख यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहे तर करुणा मुंडे यांनी आपला स्वराज्य पक्षांकडून उमेदवारी दाखल केली आहे या तिघांची सह २६ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहे

आज अर्ज दाखल करणारे उमेदवार १)मुस्तफा मैनुद्दीन शेख २)हिदायत सादेख अली सय्यद ३)सुलेमान खेरोद्दीन महमद ४)अश्फाक सज्जाद शेख ५)गौतम प्रकाश आदमाने ६)राजेभाऊ श्रीराम फड (२ अर्ज) ७)केशव ज्ञानोबा मुंडे ८)धनराज उर्फ धनंजय अनंतराव मुंडे ९)सेवक सखाराम जाधव १०)सरफाज बाबाखान पठाण रा माजलगाव ११)नुर महमद अमिरसाब कुरेशी १२)अलका प्रभाकर सोळुंके १३)राजेसाहेब श्रीकिशन देशमुख १४)शाकेर अहमद शेख १५)मतीन समदानी शेख १६)सोहेल रज्जाकत सायेद १७) आतीक युसुफ पठाण १८)सिकंदर आशपाक सय्यद १९)करुणा धनंजय मुंडे २०) शंकर शेषेराव चव्हाण २१)शेख शेषेराव चव्हाण २२)प्रभाकर विठ्ठलराव वाघमोडे २३)दयानंद नारायण लांडगे २४)साहस पंढरीनाथ आदोडे२५) शेख तौसीफ अब्दुल सत्तार २६)मुस्तफा मैनुद्दीन शेख २७)दिलीप संभाजीराव बीडगर २८)केदारीनाथ वैजनाथ जाधव २९)राजेसाहेब सुभाष देशमुख सोमवार दि २९ अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख आहे उद्या एकूण परळी विधानसभा मतदारसंघात किती उमेदवार विधानसभेच्या रिंगणात असणार आहेत हे स्पस्ट होईल.




# ॲड. सुरेश हात्ते यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल

## प्रस्थापित विरोधात विस्थापिंत राजकारण तापले

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई विधानसभा मतदार संघातून श्रीक्षेत्र नारायण महाराज गडाचा आणि जनतेचा आशीर्वाद घेत ड.सुरेश हात्ते यांनी आपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला असून त्यांना ग्रामीण जनतेचा चांगला प्रतिसाद मिळणार अशी जनसमण्यात चर्चा आहे. गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील माजी जि. प. सदस्य श्री सुरेश हात्ते यांनी सोमवारी नारायणगडांचे महंत ह भ प शिवाजी महाराज यांचा आशीर्वाद घेऊन गेवराई मतदार संघातून अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज दाखल केला आहे यावेळी. मधुकर आदड सिरपत अंतरवाला, रावसाहेब पिंपळे , विठ्ठल चव्हाण ,गोविंद पवार रामपुरी, विकास हात्ते, पत्रकार आर आर आबा, नारायण भांडवलकर, नाथा कावळे, कृष्णा कावळे, शिवाजी काकडे, बाबुराव शिंगणे, सुनील नाटकर, संतोष पिंपळे, दत्ता मस्के, सुरेश शिंदे, नानासाहेब गाडे, संजय पवार, बाळू साबळे, शेकडो कार्यकर्ते यांची प्रमुख उपस्थिती होती. सोमवारी सकाळी अनेक वडीलधारी मंडळीचा आशीर्वाद घेऊन व तलवाडा येथील त्वरिता मातेचा आशीर्वाद घेऊन श्री सुरेश हात्ते यांनी उमेदवारी अर्ज भरला यावेळी बोलतांना ते म्हणाले की गेवराईच्या सर्वांगीण विकासासाठी कायम कटिबद्ध राहील यामुळे यंदा गेवराईकर मतदानरुपी आशीर्वाद देतील असा विश्वास सुरेश हात्ते यांनी व्यक्त केला.

पान १ वरून...

**मागील पाच वर्षांत ....**

विधानसभेच्या अधिकृत उमेदवार म्हणून मी नमिता मुंदडा आज रोजी केज विधानसभेतील जनतेच्या आशीर्वादाने पुन्हा एकदा निवडणूक लढविण्यासाठी साध्या पद्धतीने आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. केजच्या जनतेने २०१९ मध्ये मला सर्वप्रथम आमदार केले मिळालेल्या संधीचे मी विकास कामे करून सोने करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. मागील पाच वर्षांत आम्ही जनतेसाठी पूर्ण वेळ उपलब्ध राहिलो. या काळात आम्ही जनतेची सेवा केली. पाच वर्षे संपली आहेत. आम्ही परीक्षेसाठी पुन्हा नव्याने सज्ज झालो आहोत. आम्हाला विश्वास आहे. की, जनता आम्हाला या परीक्षेत ही पुन्हा उत्तीर्ण करेल. जनता आम्हाला परत एकदा पाच वर्षांसाठी निवडून देईल. सगळ्या समाजाला न्याय मिळाला पाहिजे अशी आमची भूमिका आहे. जनता आम्ही केलेल्या विकासकामांना समोर ठेवून नक्कीच आम्हाला मतदान करतील. आम्ही आरपीआय सह सर्वांना सोबत घेऊन निवडणुकीला सामोरे जाणार आहोत. विकास हाच आमचा मुख्य मुद्दा आहे. आम्ही पाच वर्षांत सातत्यपूर्ण जनसंपर्क ठेवला आहे. मूलभूत सुविधा पुरविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. या पाच वर्षांत जे करता आले नाही. ते पुढील पाच वर्षांत करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करू असा विश्वास माजी आमदार नमिता अक्षय मुंदडा यांनी व्यक्त केला. यावेळी महायुतीच्या सर्व पक्षाचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**जरांगे पाटलांचे सहकारी ...**

पाटलांच्या अनेक शिलेदारांनी एक सोबत येऊन उमेदवारी अर्ज दाखल करुन आम्ही सर्वजण एक आहोत आणि जरांगे पाटलांचा आदेश अंतिम असेल हे दाखवून दिल्याचं उमेदवारांनी म्हटलं आहे. लढेंगे, जितेंगे हम सब जरांगे अशी घोषणा देऊन हे उमेदवारी अर्ज करण्यात आले आहेत. उमेदवारी अर्ज दाखल केले असले तरी मात्र जरांगे पाटील ३० ऑक्टोबर रोजी कोण-कोणत्या मतदार संघात निवडणूक लढवायची हे जाहीर करणार आहेत. बीडमधून जरांगे पाटलांचा उमेदवार कोण असणार ? याकडे आता सर्वांचं लक्ष लागलं आहे. यामुळे जरांगे पाटलांचा उमेदवार कोण ? असेल याची पाटलांच्या निर्णयापर्यंत सर्वांनाच प्रतीक्षा करावी लागणार आहे.आज गंगाधर (नाना) काळकुटे पाटील यांनी नारायणगडाचे दर्शन घेऊन अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. आजपर्यंत मराठा आरक्षण आणि समाजाच्या प्रश्नांसाठी अगदी ग्राऊंड लेवलपासुन ते दिल्ली पर्यंत त्यांनी आंदोलनं आणि पाठ पुरावा केलेला आहे. तर जरांगे पाटलांचा जो आदेश येईल त्याचे मी पालन करणार अशी प्रतिक्रिया गंगाधर काळकुटे पाटलांनी दिली आहे.

पान १ वरून...

**एकनाथ शिंदेंच्या....**

भांडूप पश्चिम- अशोक पाटील
मुंबादेवी- शायना एनसी
संगमनेर- अमोल खताळ
श्रीरामपूर - मल्हारी कांबळे
नेवासा- विठ्ठल लंघे पाटील
धाराशिव- अजित पिंगळे
करमाळा- दिग्विजय बागल
बार्शी- राजेंद्र राऊत
गुहागर- राजेश बेंडल
पाठिंबा- जनसुराज्य
हातकणंगले- अशोकराव माने
राजश्री शाहू विकास आघाडी
शिरोळ- राजेंद्र यड्रावकर

शायना एनसी, रावसाहेब दानवेंच्या लेकीला उमेदवारी

भाजप नेत्या शायना एनसी वरळी विधानसभा मतदारसंघातून इच्छुक होत्या. मात्र, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून वरळीत मिलिंद देवरा यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. यानंतर शायना एनसी यांना शिवेसनेकडून मुंबादेवी मतदारसंघातून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. तर, रावसाहेब दानवे यांची कन्या संजना जाधव हिनं काल शिवसेनेत प्रवेश केला होता. तिला देखील कन्नड विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे.

बार्शीमधील अपक्ष आमदार राजेंद्र राऊत हे भाजपचे समर्थक मानले जातात.मात्र, जागा वाटपामध्ये बार्शीची जागा एकनाथ शिंदे यांच्याकडे गेल्यानतंर राऊत यांनी शिवसेनेत प्रवेश केला. या ठिकाणी शिवसेनेकडून राजेंद्र राऊत यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

कोल्हापूरमधील दोन जागांवर मित्रपक्षांना पाठिंबा

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून कोल्हापूरमध्ये हातकणंगलेच्या जागेवर जनसुराज्य पार्टीच्या उमेदवाराला पाठिंबा जाहीर करण्यात आला आहे. भाजपनं देखील शाहूवाडी मतदारसंघात जनसुराज्य पार्टीचे विनय कोरे यांना पाठिंबा जाहीर केला आहे. एकनाथ शिंदे यांनी शिरोळ मतदारसंघात राजेंद्र यड्रावकर यांना पाठिंबा जाहीर केला आहे.

शिवसेनेकडून ७८ जागी उमेदवार तर दोन जागा मित्रपक्षांना

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेककडून पहिल्या यादीत ४५, दुसऱ्या यादीत २० आणि तिसऱ्या यादीत सेनेचे १३ आणि मित्रपक्षांचे २ असे उमेदवार जाहीर केले आहेत. म्हणजेच शिवसेना ७८ आणि मित्रपक्ष २ जागा लढवणार आहेत.

महायुतीकडून भाजपनं १४६ आणि मित्रपक्ष ४ अशा १५० एकनाथ शिंदे यांची शिवसेना ७८ आणि मित्रपक्षांचे २ अशा ८० जागा जाहीर केल्या आहेत. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून ४९ जागा जाहीर करण्यात आल्या आहेत.

# फटाकेमुक्त व प्रदुषणमुक्त दिपावली म्हणजेच पर्यावरणीय,आरोग्यदायी दिपावली साजरी करूया - वसुदेव बप्पा गायकवाड

केज/प्रतिनिधी

दिपावली हा सण मोठा आहे.तरीही जनतेने फटाकेमुक्त व प्रदूषणमुक्त म्हणजेच पर्यावरणीय व आरोग्यदायी दिपावली साजरी करावी असे आवाहन माजी प्राचार्य, जेष्ठ विचारवंत,जेष्ठ समाजसेवक,आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण व स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता. केज.जि.बीडचे संस्थापक अध्यक्ष वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले आहे.फटाक्यांच्या आतिशबाजी मुळे प्रदूषण मोठ्या प्रमाणात होते.हवा दुषीत झाल्यामुळे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी होते. वातावरण,हवा दुषीतहोते मानवासह सृष्टीवरील सर्व जीव -जंतुना मोठ्या प्रमाणात हानी पोहचते.फटाके फोडताना अनेक बालके,युवक,वयस्कर व्यक्ती व मुली,महिलांना ही शारीरीक इजापोहचते, व दुरगामी परिणामहोऊन अनेकांना कायमचे अपंगत्व येते,कोणाचे डोळे,कान,नाक,हात,पाय निकामी होऊ शकतात. केवळ फटाके फोडल्या मुळे पर्यावरणासह,मानव व सर्व जिवजंतु यांना प्रदुषणाला बळी पडावे लागते.जनतेने याबाबतीत सजग,साक्षर,व सुरक्षित राहण्याचा प्रयत्न करावा व पर्यावरणीय व प्रदूषण मुक्त दिपावली मोठ्या उत्साहात साजरी करावी असे आवाहन वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले आहे.



## जाहीर प्रगटन

कलम १३ ( ३ ) जन्म - मृत्यू नोंदणी कायदा १९६९ प्रमाणे जन्म मृत्यु प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व जनता मौजे गुंज बु. ता. घनसावंगी यांना या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, श्री/श्रीमती/कु. नवनाथ बाळासाहेब सावध रा.गुंज बु. ता. घनसावंगी जि.जालना येथील रहीवाशी असल्याबाबत अर्ज, प्रतिज्ञापत्र, देवुन त्यांनी त्यांचा/ त्यांची/मुले नामे वैष्णवी नवनाथ सावध यांचा / हिच्या जन्म दि. ०७/०७/ २०१० ही दर्शविलेली आहे. अर्जदार यांनी जन्म नोंद / मृत्यु नोंद आदेश मिळणेसाठी या कार्यालयात विनंती अर्ज दिलेला असुन, उपरोक्त जन्म नोंद / मृत्यु नोंद बाबत कोणास काही उजर/ हरकती/ आक्षेप/ आरोप असे यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात कळवावे. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास कोणास काही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदारास जन्म / मृत्यु नोंद आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक २२/१०/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्का निशी जाहीर करण्यात आले आहे.

**तालुका दंडाधिकारी**
**घनसावंगी.**

# उमेदवारी अर्ज भरण्यासाठी हजारो मतदारांनी उपस्थित राहण्याचे आमदार लोणीकर यांचे मतदारांना आवाहन

## आज २९ ऑक्टोबर २०२४ रोजी आमदार लोणीकर शक्ती प्रदर्शना सह उमेदवारी अर्ज करणार सादर

वने व सांस्कृतिक मंत्री सुधीरभाऊ मानगुंटीवार यांची लाभणार उपस्थिती

**प्रतिनिधी** । जालना

परतूर विधानसभा मतदारसंघात शेगाव पंढरपूर दिंडी महामार्ग या सह प्रमुख राज्य मार्ग महामार्ग जिल्हा मार्ग गावा गावाला जोडणारे रस्ते, प्रत्येक रस्त्यावर पूल, गावागावातील तांडे वाड्या वस्त्यावरील पाणंद रस्ते परतुर शहरातील उड्डाणपूल, स्वर्गीय भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वातानुकूलित नाट्यगृह, वंदनीय विश्वरत्न परम पूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह तालुका व जिल्हा सत्र न्यायालयाच्या इमारती, क्रीडा संकुल, गावा गावात २४ तास वीज उपलब्ध होण्यासाठी नवीन पोल व डिप्या करीता आणी मतदार संघाच्या सर्वांगीन विकासासाठी आपण केंद्र व राज्य सरकार च्या माध्यमातून गेल्या पाच वर्षात सात हजार कोटी रुपये निधी उपलब्ध करून आणला असल्याची माहिती माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली.

भारतीय जनता पार्टी व महायुती ची अधिकृत उमेदवारी जाहीर झाल्यानंतर स्वतःच्या मूळ गावी ग्रामदैवतांचे दर्शन घेण्याच्या निमित्ताने आमदार बबनराव लोणीकर लोणी येथे पोहोचले असता नागरिकांनी आयोजित केलेल्या सत्कार समारंभ सोहळ्या प्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर यांनी आपण परतुर विधानसभा मतदार संघात केलेला सर्वांगीण विकास हाच मुद्दा सर्वसामान्य जनतेपर्यंत घेऊन जाणार असल्याने परतुर विधानसभा मतदारसंघातील सर्वसामान्य जनता मला ३० हजाराच्या मताधिक्याने विजयी करेल असा दावाही यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी केला.

आमदार बबनराव लोणीकर पुढे बोलताना म्हणाले की परतुर तालुक्यात ६३४९ घरकुला करीता (८० कोटी रुपये), मंठा तालुक्यातील ६९६१ घरकुला करीता (१०१ कोटी रुपये) व जालना तालुक्यातील १४८४ घरकुला करीता (१८ कोटी रुपये) परतूर विधानसभा मतदारसंघात अशा एकूण १४७८४ घरकुलासाठी १९९ कोटी रुपयांच्या निधी अहिल्यादेवी होळकर आवास योजना, यशवंतराव चव्हाण घरकुल योजना, शबरी आवास योजना. रमाई आवास योजना आणी मोदी आवास योजनेचा लाभ गावागावातील नागरिकांना लाभार्थ्यांना मिळवून देण्याकरिता आपण परतुर व मंठा येथे आढावा बैठकी घेऊन विशेष कॅम्पचे आयोजन करून जिल्हाधिकारी जालना यांच्या जालनात बैठक घेऊन निधीची मागणी करत सर्वसामान्यांना घराचा आधार मिळावा याकरिता विशेष प्रयत्न केला आहे. पुढे बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की मंठा व परतुर या दोन उपजिल्हा रुग्णालयासाठी प्रत्येकी ६० कोटी रुपये प्रमाणे १२० कोटी रुपये वाटूर आष्टी दहिफळ खंदारे ढोकसाळ श्रीष्टी व सातोना या सहा प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी प्रत्येकी ६ कोटी २२ लाख रुपये प्रमाणे ३७ कोटी ३२ लाख रुपये तर खोराड सावंगी व उस्वद येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रासाठी प्रत्येकी ५५ लाख रुपये याप्रमाणे १ कोटी १० लाख रुपये निधी आपण मंजूर करून आणला असल्यामुळे परतुर विधानसभा मतदारसंघात आता रुग्णांना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध होणार



असल्याचं यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी आवर्जून नमूद केलं.

यावेळी उपस्थित लोणीकर साहेब यांचे ज्येष्ठ सहकारी आनंताजीजा यादव महारुद्र आप्पा आवटे जगन्नाथ काकाजी यादव गोविंद मामा चव्हाण दिगंबर अप्पा अंकुशकर आसाराम आप्पा अंकुशकर विनायकराव शिवाजी जोशी वामन काका पडघन ननवरे अशोक बाप्पा यादव बळीराम बेरसले विश्वंभर अप्पा अंकुशकर तुकाराम जी नवघरे विश्वनाथ नाटकर अप्पा अंकुशकर अंकुश देशमुख धोंडीबा गोरे राधाकिसन कवळे उद्धवबापू कवळे विठ्ठल राव तौर भगवानराव यादव रामजी तात्या यादव यशवंत यादव लक्ष्मण यादव विजय यादव उत्तमराव तूवर भीमराव ननवरे सरदार भाई पठाण मुस्तफा शेख बबनराव यादव सुनील पडघन अनिल पडघन प्रल्हाद नन्नवरे बाळू नन्नवरे सचिन बेलसले माणिक राठोड बालासाहेब यादव श्रीरंग यादव बन्सी यांना नाटकर लिंबाबा साळवे हरिभाऊ ससाने अशोकतौर अशोक कवळे नामदेव पवार विनायक राठोड सतीश पवार दत्ता पवार प्रताप अंभोरे शिवाजी चव्हाण मोहन नवघरे बबन आप्पा शेटे अशोक आबा आवटे अनंत यादव दत्ताभाऊ अंकुशकर पांडुरंग वाघमारे रमेशराव तौर बाळासाहेब आवटे महेश अंकुशकर बाळकृष्ण अंकुशकर मोहन नवघरे दिलावर पठाण दत्ता जाधव महादेव तुवर मोहन तुवर मास्तर तुवर विकास तुवर विश्वनाथ चव्हाण सदाशिव बेरसले काशिनाथ दिलावर पठाण रखमाजी सुरवसे सुंदरराव गायके नानाभाऊ बहिरे भारत पवार शिवाजी पवार बंडू वाशिंबे राजू चव्हाण नरसिंह यादव संतोष यादव शाळीग्राम तौर कृष्णा वाघमारे पुरुषोत्तम यादव अशोक चव्हाण भागवत कवळे दीपक नन्नवरे विकास अंकुशकर रोहन अंकुश कर महादेव तूवर सरपंच गजानन लोणीकर तसेच गावातील सर्व ज्येष्ठ नागरिक व युवक मंडळ उपस्थित होते.

# लहुजी शक्ती सेनेचा परळी विधानसभेत धनंजय मुंडेंना जाहीर पाठिंबा

**प्रतिनिधी** । परळी

कृषिमंत्री धनंजय मुंडे यांना लहुजी सेनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णू भाऊ कसबे यांच्या मान्यतेने लहुजी शक्ती सेनेने परळी विधानसभा निवडणुकीत बिनशर्त पाठिंबा देण्याचे जाहीर केले असून त्याबाबतचे पत्र लहुजी शक्ती सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी धनंजय मुंडे यांना दिले आहे. मातंग समाजाची महाराष्ट्रातील नामवंत संघटना म्हणून होऊ शकते महायुतीचे अधिकृत उमेदवार धनंजय मुंडे यांना आपण पाठिंबा घोषित करत असून लहुजी शक्ती सेनेचे सर्व पदाधिकारी धनंजय मुंडे यांना विजयश्री खेचून आणण्यासाठी सर्वतोपरी मदत करतील असे या पाठिंबाच्या पत्रात नमूद केले आहे. त्याचबरोबर धनंजय मुंडे यांनी विधानसभा निवडणूक निवडून आल्यानंतर मातंग समाजाच्या विविध सामाजिक, शैक्षणिक व राजकीय प्रश्नांना त्यांच्या माध्यमातून वाचा फोडून हे प्रश्न सोडवावेत अशी अपेक्षाही लहुजी शक्ती सेनेने व्यक्त केली आहे.

दरम्यान लहुजी शक्ती सेनेच्या



पाठिंब्याचे आपण मनापासून स्वागत करत असून त्याबद्दल लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णू भाऊ कसबे यांसह सर्व पदाधिकाऱ्यांचे आभारी असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले असून मातंग समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी मी कायमच कटिबद्ध आहे असेही धनंजय मुंडे म्हणाले आहेत. यावेळी ज्येष्ठ नेते वाल्मिक अण्णा कराड, लहुजी शक्ती सेनेचे युवक प्रदेशाध्यक्ष भागवत वाघमारे, युवक जिल्हाध्यक्ष निलेश सगट, नरसिंग गायकवाड, दीपक क्षीरसागर, सोमेश क्षीरसागर, किरण सकट, पवन सकट, लखन कुचेकर, कृष्णा साबळे, विनायक मस्के यांसह लहुजी शक्ती सेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.



**बीड – लोकनेते जयदत्त आणणा क्षीरसागर यांचा बीड विधानसभेचा अपक्ष अधिकृत उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल करताना महिला आघाडी प्रमुख जयश्री विलास विधाते, अरुणनाना डाके, सुधाकरभाऊ मिसाळ, अंबादासभाऊ गुजर, गिरीशदादा देशपांडे, सखारामभाऊ मस्के, अरुण भाऊ बोंगाणे, खाजाभैय्या व इतर सहकारी.**

# प्रा सुहास चौधरी आम आदमी पार्टीच्या आष्टी तालुका अध्यक्षपदी निवड

**प्रतिनिधी** । बीड

बीड येथे आम आदमी पार्टीची माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते यांची बैठक बीड येथील जिल्हा संपर्क कार्यालय येथे संपन्न झाली या बैठकीमध्ये येणाऱ्या विधानसभा निवडणुका व पक्षाची भूमिका यावरती चर्चा करण्यात आली त्याच अनुषंगाने आष्टी तालुकाध्यक्ष पदी प्राध्यापक सुहास चौधरी यांची नियुक्ती करण्यात आली व सर्व कार्यकर्त्यांनी पदाधिकाऱ्यांनी त्यांना पुढील कार्यास हार्दिक हार्दिक शुभेच्छा दिल्या यावेळी आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अशोक येडे आमचे



मार्गदर्शक प्रा . राम बोडके युवा नेते स्वप्निल पोटे रफिक पठाण अल्पसंख्याक विभाग प्रमुख दत्ता सुरवसे बीड तालुका संघटन मंत्री सुरेश जाधव संतोष चौधरी इत्यादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते



बीड - एकच पर्व ओबीसी सर्व सकलं ओबीसी,एस सी.एस टी मुस्लिम व सकलं बहुजन समाजाच्या न्याय, हक्कांसाठी नितीन जायभाये बीड विधानसभेच्या रिंगणात.

# शेवटच्या श्वासापर्यंत जनसेवेसाठी लढत राहणार - राजेभाऊ फड

## राजेभाऊ फड यांचा उमेदवारी अर्ज दाखल; मतदारसंघातून नागरिकांची मोठी उपस्थिती

**प्रतिनिधी** । परळी

परळी वैजनाथ विधानसभा मतदारसंघातील युवक नेते राजेभाऊ श्रीराम फड यांनी सोमवार दिनांक २८ ऑक्टोबर रोजी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. मतदारसंघातील माता - भगीनिंची यावेळी मोठ्या संख्येने उपस्थिती होती. अर्ज दाखल करतेवेळी मतदारसंघातील जनतेची मोठ्या प्रमाणावर स्वयंस्फूर्तीने उपस्थिती होती. जनतेच्या आग्रहास्तव आपण उमेदवारी अर्ज दाखल करत असून शेवटच्या श्वासापर्यंत मी जनसेवेसाठी स्वतःला वाहून घेणार असल्याची प्रतिक्रिया युवक नेते राजेभाऊ फड यांनी व्यक्त केली.



उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर राजेभाऊ फड यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित जनसमुदायाला संबोधित केले. तद्नंतर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज, विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह सर्व महामानवाच्या पुतळ्यास हार घालून अभिवादन केले.

परळी विधानसभा मतदारसंघात युवक नेते राजेभाऊ फड यांनी मोठे शक्तिप्रदर्शन करून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. मतदारसंघातील जनता आपल्याला अनुकूल असून यंदाची विधानसभा निवडणूक आपण लढवावी असा जनतेचा आग्रह आहे. देशाचे नेते शरदचंद्र पवार साहेबांचा मी कालही आदर करत होतो आणि आजही आदर करतो. पक्षाने कोणालाही जरी उमेदवारी जाहीर केलेली असली तरी शेवटपर्यंत काहीही होऊ शकते. आम्ही आजही आशावादी आहोत, पवार साहेब नक्कीच आमचा विचार करतील. परळी विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार आणि राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी या भकाचा विकास करण्याऐवजी मतदारसंघाची वाट लावली. आजच्या घडीला मतदारसंघात त्यांनी हप्तरखोरीला बळ दिलेले आहे, भ्रष्टाचाराला त्यांनी पाठबळ दिले. इथला उद्योग आणि व्यापार बंद पाडण्याचे महापाप त्यांनी केले. त्यामुळे हजारो तरुण आज बेरोजगार झालेले आहेत. मतदारसंघातील गुंडाराज संस्कृतीला पालकमंत्र्यांनी खतपाणी घातल्याने महिलांची सुरक्षा वाऱ्यावर आहे. शेतकरी आणि कष्टकरी वर्गाचे बेहाल झालेले आपल्याला दिसेल. हे सर्व चित्र आता बदलायचे असेल तर आता बदल घडवावा लागेल. मतदारसंघात ऊस उत्पादक शेतकरी संख्या जास्त आहे. असे असतानाही पालकमंत्र्यांनी वैद्यनाथ कारखाना बंद पाडण्याचे महापाप केले. इथली कारखानदारी संपुष्टात आणली... तुम्ही मला आमदार करा मी तुम्हाला कारखाना देतो. जो कारखाना कधीही बंद होणार नाही असे आश्वासन हजारोंच्या संख्येने उपस्थित असलेल्या जनसमुदायाला राजेभाऊ फड यांनी दिले.

### गुंडाराज संस्कृती संपुष्टात आणायची

राज्यातील इतर मतदारसंघात आणि परळी मतदारसंघातील वातावरणात मोठ्या प्रमाणावर बदल आहे. परळीतील नागरिक दहशतीखाली जीवन जगत आहेत. अनेक व्यापाऱ्यांनी आपापली संपत्ती विक्री काढली असून ते स्थलांतर करण्याच्या मनस्थितीत आहेत. असेच होत राहिले तर इथली सामाजिक आणि आर्थिक घडी विस्कटली जाईल. म्हणूनच मी संघर्ष करत असून मला फक्त परळीतील गुंडाराज संस्कृती संपुष्टात आणायची असे प्रतिपादन युवक नेते राजेभाऊ फड यांनी केले.



# कुंडलिक खांडे यांची देखील बीड विधानसभेसाठी उमेदवारी दाखल ?

**प्रतिनिधी** । बीड

बीड विधानसभा क्षेत्रातील प्रस्थापित पुढार्यांनी कायम जनतेला केवळ विकासाच्या भुलथापाच दिल्या आहेत. विकासाचे कोणतेही व्हिजन त्यांच्याजवळ नाही. केवळ स्वत:चे पुढारपण टिकवण्यासाठी विकासाची नाटके करुन दाखणार्यांना हबाडा देण्यासाठी आपण विधानसभा निवडणूकीच्या मैदानात उतरलो असून जनता जनार्धन नक्कीच आपल्याला आशिर्वाद देईल असा विश्वास मराठासेवक तथा सरपंच, उपरसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांनी व्यक्त केला.सोमवार दि.२८ रोजी श्री.खाडे यांनी बीड विधानसभेसाठी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरला.


# विकास कामांचा आश्वेमेध सुरु ठेवण्यासाठी माय बाप जनता मला आशीर्वाद देईल- आ.लक्ष्मण पवार

## एकदम साध्या पध्दतीने आ.लक्ष्मण पवारांनी भरला आपला उमेदवारी अर्ज

**प्रतिनिधी ।** गेवराई

गेल्या दहा वर्षां पुर्वी मतदारसंघात असलेली परिस्थिती व आज मतदार संघात झालेला बदल जनतेला माहीत आहे पुर्वी गोरगरीब रेशनकार्ड धारकास राशन मिळत नव्हते पण आमदार म्हणून गेवराई तालुक्यातील राशन वितरण व्यवस्था सुरळीत करण्यासाठी प्रमाणिक प्रयत्न करीत बायोमेट्रिक प्रणाली सुरु करुन गोरगरीबांना हाक्काचे राशन मिळवुन देण्यासाठी केलेले प्रमाणिक प्रयत्न जनता कधीच विसरणार नाही असा मला विश्वास आसल्याचे आ.लक्ष्मण पवार यांनी म्हटले आहे

मतदारसंघातील लोकप्रिय आमदार लक्ष्मण माधवराव पवार यांनी आज दि.२८ ऑक्टोबर रोजी एकदम साध्या पध्दतीने आपला अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला यावेळी शिवराज पवार जे.डी. शहा, राहुल खंडागळे,शिनुभाऊ बेद्रे,धम्मपाल सौदरमल, जमील सेठ, काशिनाथ पवार, आदीच्या उपस्थितीत आ.लक्ष्मण पवार यांनी आपला



उमेदवारी अर्ज दाखल केला आहे

गेवराई मतदारसंघातील जनतेने मला दोन वेळेस सेवा करण्याची संधी दिलेली आहे या दहा वर्षात प्रमाणीक पारदर्शक दर्जेदार केलेला विकासावर मतदारसंघातील जनता विश्वास व्यक्त करील असा मला विश्वास आसल्याचे आ.लक्ष्मण पवार म्हणाले आहेत पुढे बोलतांना ते म्हणाले की मतदारसंघातील जनतेने दिलेल्या दहा वर्षांत रस्ते,जलसिंचनासाठी अनेक बंधारे बांधण्यात आले, वीज वितरण करण्यासाठी अनेक ठिकाणी ३३ के व्ही केंद्र उभारून मतदारसंघातील विजेचा प्रश्न मार्गी लावला आहे, असे प्रश्न मार्गी लावले आहेत तर अनेक गावांत विकासाचे स्तोत्र सुरु आहे तो असाच सुरु ठेवण्यासाठी मतदारसंघातील माय जनतेने मला आशीर्वाद द्यावा असे आव्हान आ.लक्ष्मण पवार यांनी मतदारांना केले आहे यावेळी अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती



बीड - मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या निर्देशानुसार २३० - बीड विधानसभा मतदार संघातून शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला.

# सुख-दु:खात मी नेहमी कार्यकर्त्यांच्या पाठिशी -अमरसिंह पंडित

**प्रतिनिधी ।** गेवराई

जनतेचे प्रश्न समजून घेण्यासाठी प्रत्यक्ष जनतेमध्ये जावे लागते, त्यांच्याशी संवाद साधावा लागतो, विद्यमान नेतृत्वाने लोकांशी संवाद कधी साधलाच नाही, सत्तेत राहून सुध्दा त्यांना जनतेच्या अपेक्षा पूर्ण करता आल्या नाहीत. त्यामुळेच कार्यकर्त्यांचा विश्वासघात झाला परिणामी सर्व कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश करत आहेत. या सर्व कार्यकर्त्यांचा सन्मान करून प्रत्येक कार्यकर्त्यांच्या सुख-दुःखात मी नेहमी त्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभा राहीन. त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी मी सदैव तत्पर होतो आणि यापुढेही राहीन. गेवराई शहरासह ग्रामीण भागाच्या रखडलेल्या विकासाला पुढे घेवून जाण्यासाठी सत्तेत जाणे गरजेचे आहे, त्यामुळे कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे काम करून महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी केले. गेवराई शहरातील साठेनगर, संघमित्रनगर परिसरातील संतोष सुतार आणि त्यांच्या असंख्य कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केला त्यावेळी ते बोलत होते.

गेवराई शहरातील साठेनगर व संघमित्र परिसरातील विद्यमान आमदारांचे खंदे समर्थक संतोष सुतार यांच्यासह मोईन कुरेशी, संदिप साळवे, प्रमोद गाडे, चंद्रकांत सुतार, बशीर कुरेशी आदी कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये जाहिर प्रवेश केला. मोठ्या अपेक्षेने आपण विद्यमान आमदारांच्या नेतृत्वाखाली काम केले पण गेल्या दशकात त्यांच्या विकासाकडे होत असलेल्या निष्काळजीपणामुळे भ्रमनिरास





झाला. दहा वर्षांत गेवराई विधानसभा मतदार संघाची जी हानी झाली ती भरून काढण्यासाठी माजी आमदार अमरसिंह पंडित आणि विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्व आणि मार्गदर्शनाची गरज आहे. आम्ही सर्व कार्यकर्ते अमरसिंह पंडित यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे आहोत. अमरसिंह पंडित यांनी आमच्यावर जो विश्वास टाकला आहे त्याला आम्ही कधीही तडा जावू देणार नाही. गेवराई शहरासह ग्रामीण भागातील विजयसिंह पंडित यांना मताधिक्य मिळवून देण्यासाठी आम्ही सर्व कार्यकर्ते जीवाची बाजी लावू असेही संतोष सुतार यांनी आपल्या भाषणात म्हटले. यावेळी सुनिल सुतार, किशोर कांडेकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

दरम्यान संतोष सुतार आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केल्यामुळे गेवराई शहरातील साठेनगर, संघमित्रनगर आदी भागांत राष्ट्रवादी ताकद वाढली आहे. यावेळी बाजार समितीचे संचालक श्रीहरी पवार, दादासाहेब घोडके, माजी नगराध्यक्ष, शेख खाजाभाई, रिपाईचे किशोर कांडेकर, ज्येष्ठ कार्यकर्ते मोहम्मद गौस, सय्यद नजीर, रविंद्र बोराडे, उत्तमराव सोलानी, संजय सुतार, विजय सुतार, यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कायकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

देवपिंप्री परिसरातील मारोती तांडा येथील असंख्य कार्यकर्ते राष्ट्रवादीत दाखल

देवपिंप्री परिसरातील मारोती तांडा येथील उपसरपंच सुदाम पवार, सचिन पवार, ग्रामपंचायत सदस्य सुरेश पवार, अंकुश राठोड, गणेश पवार, बदाम पवार, संदिप पवार, रमेश राठोड, बाळू राठोड, बाळू चव्हाण, सुनिल चव्हाण, अनिल पवार, आदित्य पवार, पोपट पवार, दत्ता पवार, भिमा राठोड, गोरख राठोड, अमोल राठोड, बळीराम राठोड, लहू पवार, सुदाम राठोड, बाळू पवार, एकनाथ पवार, संदिप पवार, सुंदर पवार, संजय राठोड आदी कार्यकर्त्यांनी माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीमध्ये जाहिर प्रवेश केला. यावेळी गणपत राठोड, बद्रीनाथ गवारे, अनिल गवारे, राजेंद्र गवारे, तिर्थराज गवारे, बाबुराव पवार, गणेश शिंदे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



बीड - मराठा सेवक उमेदवार (२३०-बीड विधानसभा) म्हणून आज दु. २.०० वाजताच्या दरम्यान तहसील कार्यालय येथे मराठा सेवक स्वप्नील भैय्या गलधर यांनी बीड विधानसभा उमेदवारीचा अर्ज दाखल केला. याप्रसंगी त्यांचा सोबत मनोज दादा जारांगे - पाटील समर्थक मराठा समाजातील समाज बांधव भैय्या वर प्रेम करणारा वर्ग सर्व समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# फटाक्यांच्या आतिषबाजीमध्ये डोळ्यांची काळजी कशी घ्याल - नेत्रतज्ञ डॉक्टर एकनाथ पवार

**प्रतिनिधी ।** बीड

दिवाळीमध्ये फटाक्यांच्या आतिषबाजीमुळे, चुकीच्या पद्धतीने फटाके वाजवल्यामुळे डोळ्यांना मोठ्या प्रमाणात इजा होणाऱ्या घटना घडतात.फटाके फोडण्याचा आनंद घेत आपले डोळे देखील सुरक्षित कसे ठेवावेत या संदर्भात आपण काळजी घेणे गरजेचे आहे. तरच आपली दिवाळी आनंदात जाईल असे मत सिद्धिविनायक नेत्रालय हॉस्पिटलचे प्रसिद्ध नेत्रतज्ञ डॉक्टर एकनाथ पवार यांनी व्यक्त केले आहे.

फटाक्यापासून आपले डोळे सुरक्षित ठेवण्यासाठी अर्धवट विझलेले फटाके हातात अथवा डोळ्याजवळ घेऊन जाऊ नये. फटाके वाजवताना सेफ्टी चष्मे वापरावेत. मोठ्या व्यक्तीने फटाके फोडताना लहान मुलासोबत असणे व त्यांच्यावर लक्ष ठेवणे गरजेचे आहे. फटाक्यामुळे डोळ्यांना ज्या इजा होऊ शकतात आणि त्यापासून निर्माण होणारे धोके आहेत त्यामध्ये प्रामुख्याने पापण्यांना मार लागून पापणी जळणे अथवा फाटणे, डोळा जळणे अथवा डोळ्यात माती खडे जाऊन इजा होणे, भुबळ फाटणे, डोळ्यात रक्त उतरणे, रेटिनाला जखम होणे, रेटिना सरकणे, डोळ्यांच्या खोबणीचे हाड फ्रॅक्चर होणे, डोक्याची नस ऑप्टिक नर्व मार लागून कायमस्वरूपी निकामी होणे या सर्व कारणामुळे अंशतः किंवा पूर्णतः अंधत्व येऊ शकते. त्यामुळे फटाके वाजवताना प्रत्येकाने लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत काळजी घेणे गरजेचे आहे.आपण फटाक्यापासून सुरक्षित अंतर ठेवले आणि वरील प्रमाणे काळजी घेतली तर फटाके वाजवण्याचा आनंद आणि डोळे देखील सुरक्षित राहण्याचा आनंद



आपली दिवाळी द्विगणित करेल हे नक्की. असे मत सिद्धिविनायक हॉस्पिटलचे मुख्य संचालक प्रसिद्ध नेत्रतज्ञ डॉक्टर एकनाथ पवार यांनी व्यक्त केले आहे.

# निमगाव मायंबा येथे श्री नवनाथ ग्रंथ पारायण व किर्तन महोत्सव

**प्रतिनिधी ।** बीड

निमगाव मायंबा तालुका शिरूर कासार येथे, प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी, मारुती मंदिर येथे श्री नवनाथ ग्रंथ व किर्तन महोत्सवास, ह भ प जनार्दन महाराज यांच्या मार्गदर्शनात प्रारंभ झाला असून, दिनांक २ नोव्हेंबर रोजी याची सांगता होणार आहे.प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी ह भ प धोंडीराम महाराज यांच्या प्रेरणेने, ह भ प वैराग्याचे महामेरू स्वामी निगमानंद महाराज यांच्या आशीर्वादाने, ह भ प महंत स्वामी जनार्दन महाराज यांच्या मार्गदर्शनामध्ये, श्री मच्छिंद्रनाथ समाधी सोहळ्यानिमित्त, श्री नवनाथ ग्रंथ पारायण व किर्तन महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. याची सांगता दिनांक २ नोव्हेंबर रोजी होणार आहे. या प्रसंगी काकडा भजन, विष्णुसहस्रनाम, गीता पाठ, पारायण, भावार्थरामायण, हरिपाठ, कीर्तन, हरिजागर, असे विविध उपक्रम राबवण्यात आलेले आहेत. तरी दिनांक २९ रोजी मंगळवारी ह भ प अनिल महाराजांची किर्तन होणार आहे. तसेच बुधवारी ह भ प नंदकिशोर महाराज खरात,गुरुवारी ह भ प मच्छिंद्र महाराज निकम, शुक्रवारी ह भ प रामेश्वर महाराज शास्त्री, तसेच शनिवार दिनांक २ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता हभप स्वामी जनार्दन महाराज गुरु निगमानंद महाराज यांचे भव्य असे काल्याचे किर्तन होणार आहे. तरी पंचक्रोशीतील बीड जिल्ह्यातील सर्व भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा! असे आवाहन समस्त गावकरी मंडळ निमगाव मायंबा यांनी आवाहन केले आहे.





# महाविर फायबर जिनिंग येथे कापुस खरेदीस प्रारंभ

**प्रतिनिधी ।** धर्माबाद

आतुकुर रोड वरील महाविर फायबर प्रायव्हेट लिमिटेड येथे रविवारी कापुस खरेदीस प्रारंभ करण्यात आले असल्याची माहिती महाविर फायबर जिनिंगचे व्यस्थापक बाबुराव पाटील यांनी सांगितले.महावीर फायबर्स प्रायव्हेट लिमिटेड चे मालक अजय जैन,सुभाष जैन यांच्या हस्ते विधीवत पूजा संपन्न झाली.बिलोलीचे शेतकरी दत्ता रांकटवार या शेतकऱ्यांचा कापसाला खरेदी करून प्रारंभ करण्यात आला. पहिल्याच दिवशी कापसाला ७०११ रुपये भाव व ५०० किव्टंल ची आवक झाली आसल्याची माहिती व्यसथापक बाबुराव पाटील यांनी उपोरोक्त प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.यावेळी साईनाथ आप्पा रोशनगाव , दिलीप सेठ कमिनवार , सत्यम सेठ उत्तरवार , आनंदराव शिंदे पाटील , बापूराव पाटील बाबलीकर , जी राज रेड्डी राम रेड्डी समस्त शेतकरी व व्यापारी उपस्थीत होते.

# माजलगाव विधानसभेसाठी प्रा.ईश्वर मुंडे यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल

## खा.शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत बंडखोरी

**प्रतिनिधी ।** धारूर

देशाचे नेते पद्म विभुषण खा.शरदचंद्र पवार साहेब व प्रदेशाध्यक्ष आ.जयंत पाटील साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून बीड जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षण विस्तार अधिकारी पदावरून स्वेच्छा सेवा निवृत्ती घेऊन राष्ट्रवादी कॅांग्रेस शरदचंद्र पवार पक्षात घारूर तालुकाक्षध्य,ओबीसी सेल प्रदेश सरचिटणीस,सेवा निवृत्त अधिकारी सेल राज्य प्रमुख या पदावर पक्षाचे सक्रीय काम करून खा.शरदचंद्र पवार साहेबांचे व पक्षाचे विचार वाडी,वस्ती, तांडयापर्यंत पोहचवले.सन.२०१९ ला माजलगाव मतदार संघाचा आमदार निवडून आनला.पक्ष फुटल्यानंतर ही निष्ठेने खा.शरदचंद्र पवार साहेबांच्या पक्षातच राहीलेले ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण करून जन सामान्यांच्या




मनात घर केलेले प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे हे खा.शरद पवार यांच्या राष्ट्रवादी कॅांग्रेस कडून माजलगाव विधानसभा लढण्यास ईच्छूक होते. मागे सन २०२१ ला छत्रपती संभाजी नगर पदवीधर मतदार संघात उमेदवारी मागणी केलेली होती,२०२४ ला बीड लोकसभा मतदार संघात जनसंपर्क वाढवून बीड लोकसभेच्या उमेदवारीची मागणी केलेली होती.वरील दोन्ही वेळी मला पक्षाने आपला नंतर विचार करू असे सांगून थांबवले.

आता सन २०२४ च्या माजलगाव विधानसभा निवडणूकीसाठी पक्षाकडे रितसर उमेदवारीची मागणी करून माजलगाव मतदार संघातील शंभर गावात जन संवाद दौरा करून पक्षाचे कार्य वाढवलेले आहे.माझ्या परिचय पत्राच्या पन्नास हजार प्रति मतदार संघातील सर्व गावांमध्ये वाटप केलेल्या आहेत. या वेळी माजलगाव मतदार संघात माझ्या विषयी मतदारांमध्ये सहानुभूती असून पक्षाने आपणास संधी द्यावी अशी जन भावना होती. या मुळे मी निश्चित निवडणूक जिंकू शकत होतो.परंतू असे न होता मला पक्षाने निवडणूक लढण्याची संधी व तिकीट दिले नाही. या मुळे मतदार संघातील जनता नाराज झालेली असून तुम्ही अपक्ष निवडणूक लढवावी आम्ही तुमच्या पाठीशी आहेत हा दबाव माझ्यावर वाढत असल्यामुळे मी माजलगाव विधानसभा मतदार संघ निवडणूक - २०२४ जनतेच्या विश्वासावर अपक्ष लढवून जिंकणार आहे असे सांगून प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांनी आज सोमवार दि.२८ ाक्टोबर २०२४ रोजी दुपारी १ वाजता आपला उमेदवारी अर्ज कोणताही गाजा वाजा न करता आई वडील दर्शन,गांजपूर येथील ग्राम दैवतांचे दर्शन घेऊन किल्ले धारूर येथील छत्रपती शिवाजी महाराज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर,लोकनेते गोरीनाथराव मुंडे साहेब यांच्या चौकात अभिवादन करून साध्या पध्दतीने निवडणूक निर्णय अधिकारी माजलगाव यांचे कडे दाखल केला आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# दीपक भाऊ रामपूरकर यांचा शक्तीप्रदर्शनात उमेदवारी अर्ज दाखल

## महिला व युवकांचा मोठा सहभाग

देगलूर, । प्रतिनिधी

महाविकास आघाडीतील काँग्रेस पक्षाच्या यादीत अव्वल क्रमांकावर युवा उद्योजक दीपक भाऊ रामपूरकर यांचे नाव असताना ऐनवेळी त्यांचे नाव डावलून दुसऱ्यांनाच उमेदवारी घोषित केल्याने हिरमोड झालेले रामपूरकर यांनी सोमवार दि. २८ ऑक्टोबर रोजी आपल्या कार्यकर्त्यासह मोठ्या शक्ती प्रदर्शनात अपक्ष म्हणून उमेदवारी नामांकन अर्ज दाखल केले आहेत. यावेळी महिला व युवकांचा मोठा सहभाग दिसून आला. तूर्त तरी रामपूरकर यांच्या उमेदवारीमुळे इतर पक्षाच्या उमेदवारा पुढे तगडा आव्हान उभा केले असल्याचे दिसून येत आहे.



विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या रणधुमाळीस प्रारंभ झाला आहे. अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव असलेल्या देगलूर मतदारसंघात गेल्या दोन अडीच वर्षापासून काँग्रेस पक्षाकडून युवा उद्योजक दीपक भाऊ रामपूरकर यांनी निवडणूक लढण्यासाठी अख्खा मतदारसंघ पिंजून काढला. यादरम्यान मतदारसंघातील अनेक गावात स्वतः पाठपुरावा करून विविध शासकीय योजनेचा लाभ मिळवून दिला. याशिवाय स्वतःच्या खिशातील पैसे टाकून अनेक विकासाभिमुख कार्य केले. त्यामुळे युवा उद्योजक दीपक भाऊ रामपूरकर व जनतेची नाळ जुळली. पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत ही रामपूरकर यांनी मोठ्या हिरहिरीने काम केले. त्यामुळे पक्षाने होऊ घातलेल्या देगलूर विधानसभा मतदारसंघातून आपल्याला उमेदवारी मिळेल अशी अपेक्षा बाळगून कामाला लागले होते . लोकसभेत मिळालेल्या विजयामुळे देगलूर मतदारसंघातून इच्छुक उमेदवारांची संख्या वाढल्याने पक्षश्रेष्ठीची देखील डोकेदुखी वाढली होती. तथापी रामपूरकर यांनी आपल्या कामाचे फलित मिळावे म्हणून पक्षश्रेष्ठीकडे फिल्डिंग ही लावली होती. पक्षाच्या यादीत अव्वल क्रमांकावर असताना सुद्धा ऐनवेळी दुसऱ्याचेच नाव घोषित झाल्याने रामपूरकर यांचा पूर्णतः हिरमोड झाला आणि कार्यकर्त्यांसह मतदार संघातील जनतेच्या रेट्यामुळे ते अपक्षाचा झेंडा हाती घेऊन आपली उमेदवारी अर्ज सोमवारी दाखल केले. रामपूरकर यांच्या उमेदवारी अर्जामुळे इतर पक्षांच्या उमेदवारांचे चांगलेच ' टेन्शन वाढले असल्याचे दिसून येत आहे.कुठल्याही परिस्थितीत निवडणूक लढविणार दिपक कांबळे रामपूरकर९० देगलूर-बिलोली ह्या मतदारसंघात गेल्या अडीच वर्षात सातत्याने अहोरात्र फिरत असतांना अनेक समस्या व लोकाभिमुख विकसित कामे झाले नाहीत.त्या अनुषंगाने संबंध मतदारसंघाचा अभ्यास केल्यानंतर मी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्या उपस्थितीत काँग्रेस मध्ये प्रवेश केला असून आज सोमवारी मी काँग्रेस पक्षाची उमेदवारी दाखल केली आहे,आणि निश्चित काँग्रेस पक्षाचे वरिष्ट नेते माझ्या उमेदवारी विषय नक्कीच विचार करतील, अशी अपेक्षा असून मी सामान्य जनतेच्या हितासाठी कुठल्याही परिस्थितीत निवडणूक लढविणार असल्याचे मत इच्छुक उमेदवार दिपक कांबळे रामपूरकरांनी पत्रकार समोर व्यक्त केला.



## प्रा. विकास ढोकणे यांना राज्यस्तरीय शिक्षकरत्न पुरस्कार जाहीर

बीड ।प्रतिनिधी

ऑल इंडिया ह्युमन राईट्स असोसियशन नवी दिल्ली तर्फे दिला जाणारा डॉ .ए .पी. जे. अब्दुल कलाम राज्यस्तरीय शिक्षकरत्न पुरस्कार प्रा.विकास बळीराम ढोकणे यांना प्रदान करण्यात आला . प्रा. विकास ढोकणे हे शासकीय तंत्रनिकेतन बीड यथे अधिव्याख्याता इंग्रजी या पदावर कार्यरत आहेत. फुले -शाह-आंबेडकर-शिवराय यांचे विचार अनुसरून प्रा. विकास ढोकणे हे परिवर्तनाच्या चळवळीत तसेच पर्यावरणाच्या चळवळीत कार्यरत आहेत.

कविता,कथा आणि वैचारिक लेखन ते सातत्याने करत आले असून महाराष्ट्रातील विविध साहित्य संमेलनामधून ते परिवर्तनाच्या कविता सादर करत आहेत.आगामी काळात प्रा. विकास ढोकणे यांचा कविता संग्रह व कथा संग्रह प्रकाशनाच्या वाटेवर आहे. पुरस्कार मिळाल्याबद्धल त्यांचे सामाजिक-शैक्षणिक स्तरातून अभिनंदन होत आहे.

प्रा. प्रदीप रोडे ,प्रा. डॉ . मनोहर सिरसाट , प्रा. डॉ .सुनील वाघमारे, अशोक भाऊ तांगडे ,तत्त्वशील कांबळे प्रा.डॉ .राजश्री तावरे ,प्रा .डॉ . अंजली वाघमारे, अविनाश हिवरेकर, निसर्गमित्र अभिमान खरसाडे,मराठवाडा शिक्षक संघटनेचे सचिव राजकुमार कदम ,चरणराज ढोकणे आदींनी त्यांचे अभिनंदन केले .

## शहरातील चहाचे दर कमी करून कागदी कप बंद करा. अनिल बोर्डे

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई शहरातील बार असोशियन माजी अध्यक्ष विधीज्ञ ॅड भीमराव मदनराव मुळे कोर्ट गेवराई यांनी शहरांमध्ये वेगवेगळ्या हॉटेलमध्ये वेगवेगळे दर असून चहाचा दर्जा मात्र सर्व ठिकाणी सारखाच असतो. सदरील चहाचे दर हे त्यांच्या संघटनेच्या नावाखाली ग्राहकाकडून सक्तीने वसूल करून ग्राहकांना संबंधित हॉटेल मालकाकडून उद्धटपणे, अपमानास्पद वागणूक दिली जाते ही बाब अर्जाद्वारे निदर्शनास आणून दिलेली आहे. त्यांचा याबाबत तक्रारी अर्ज ग्राहक पंचायत महाराष्ट्र बीड शाखेकडे प्राप्त झालेला आहे.



त्याची दखल घेऊन बीड जिल्हा ग्राहक पंचायत उपाध्यक्ष तथा गेवराई ग्राहक पंचायत मार्गदर्शन केंद्र प्रमुख यांनी त्याची दखल घेऊन मा. जिल्हाधिकारी बीड, मा. तहसीलदार गेवराई मा. मुख्याधिकारी नगरपरिषद गेवराई यांना तक्रारीवर योग्य ती कार्यवाही करावी असे नमूद केले आहे. तसेच गेवराई शहरात ज्येष्ठ नागरिकांना व प्रतिष्ठित नागरिकांना व ग्राहकांना चहाचे पैसे देऊन देखील विनाकारण अपमानास्पद व उद्धटपणाची वागणूक सहन करावी लागते ही बाब गंभीर स्वरूपाची आहे. गेवराई शहरात हॉटेल मालक संघटनेच्या नांवावर मनमानी करीत आहे व वेळोवेळी ग्राहकांना अपमान व हिन दर्जाची वागणूक दिली जाते अशा हॉटेल मालकाचा परवाना रद्द करून योग्य ती हॉटेल मालका विरुद्ध नियमाप्रमाणे कार्यवाही करावी त्याशिवाय हॉटेल मालकाच्या वर्तणुकीमध्ये सुधारणा होणार नाही. वरील बाबीचा विचार करून गेवराई शहरातील चहाचे दर कमी करून व हॉटेलमधील कागदी चहाचे कप आरोग्याच्या दृष्टीने घातक असल्यामुळे तात्काळ बंद करण्यात यावेत. ग्राहकांना काचेच्या ग्लासामध्ये चहा देण्यात यावा अशी मागणी तक्रारदाराने आवेदनाद्वारे बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांच्याकडे केलेली आहे .तक्रारीची दखल बीड जिल्हा ग्राहक पंचायत उपाध्यक्ष अनिल बोर्डे व गेवराई ग्राहक पंचायत अध्यक्ष प्रा. भानुदास फलके यांनी घेऊन संबंधित कार्यालयास अवगत केले आहे.

## रमाकांत मुंडे यांना नॅशनल युनियन ऑफ जर्नालिस्टच्या महाराष्ट्र युनिटचे कमिटी सदस्य केले

मुंबई नॅशनल युनियन ऑफ जर्नालिस्ट, इंडियाशी संलग्न असलेल्या महाराष्ट्र युनिटचे एनयूजेआई उपाध्यक्ष आणि निरीक्षक शिवेंद्र कुमार यांच्या देखरेखीखाली हिंदू जिमखाना, मरीन लाइन्स, मुंबई येथे झालेल्या बैठकीत नवीन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. याशिवाय आगामी कार्यक्रमांची रूपरेषाही ठरविण्यात आली. मुंबई युनिटचे अध्यक्ष हंसराज कनोजिया (तरुणमित्र), सरचिटणीस मयूर पारीख (न्यूज कॉन्टी-न्यूज) आणि कोषाध्यक्ष वसुधा धुमक (खबरें-आज तक) यांची नवीन कार्यकारिणीत निवड करण्यात आली. तीन उपाध्यक्ष मध्ये बाबा लोंढे, संजना भारती गांधी (पुणे) आणि अजितसिंह मट्टा यांची नावे



प्रमुख आहेत.नवीन कार्यकारिणीत समाविष्ट करण्यात आलेल्या चार सचिवांमध्ये पीसी कपाडिया, (फिल्म क्शन-छपू डॉट कॉम), शर्वरी ए. जोशी (स्वतंत्र पत्रकार), राज पांडे, (सीईएन न्यूज), मनीष शेठ (जनसत्ता-लोकसत्ता) ही प्रमुख नावे आहेत.दोन कार्यालयीन सचिवांमध्ये श्री दिनेश सावलिया (गुजराती मिडडे) आणि सुनील निकम (जनसंदेश टीव्ही) (नाशिक) यांची नावे प्रमुख आहेत. मीडिया सेल: मीडिया सेलमध्ये निवडलेल्या दोन मीडिया व्यक्तींची नावे आहेत इम्तियाज अझीम (सहारा समय टीव्ही) जिन्ना दत्ता (झी - ५).याशिवाय ८ कार्यकारिणी सदस्य निवडून आले ज्यांची नावे शांत कुमार (टाइम्स ऑफ इंडिया), शादाब खान (मिडडे इंग्लिश), सतीश सोनी (जीएसटीव्ही न्यूज चॅनल), मनीष गुप्ता (दैनिक भास्कर), विजय गोहिल (फ्री-प्रेस जर्नल्स) अशी आहेत. ), अनुक्रमे अर्जुन कांबळे (सामना-हिंदी), विजय बाटे (सकाळ), सुषमा पाटील (सकाळ, पुणे), इम्तियाज शेख (उर्दू टाइम्स), रमाकांत मुंडे (बॉलिवुड न्यूज), परेश बी मेहता (संपादक-फिल्म टाऊन), विरल व्यास (जन्मभूमी- गुजराती दैनिकाची नावे) अल्पेश विजय म्हात्रे (दैनिक प्रहार) प्रमुख आहेत.

# माजलगाव विधानसभेसाठी प्रा.ईश्वर मुंडे यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल

## खा.शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत बंडखोरी

धारूर / माजलगाव (प्रतिनिधी)

देशाचे नेते पद्म विभुषण खा.शरदचंद्र पवार साहेब व प्रदेशाध्यक्ष आ.जयंत पाटील साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून बीड जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षण विस्तार अधिकारी पदावरून स्वेच्छा सेवा निवृत्ती घेऊन राष्ट्रवादी कॅांग्रेस शरदचंद्र पवार पक्षात धारूर तालुकाक्षध्य,ओबीसी सेल प्रदेश सरचिटणीस,सेवा निवृत्त अधिकारी सेल राज्य प्रमुख या पदावर पक्षाचे सक्रीय काम करून खा.शरदचंद्र पवार साहेबांचे व पक्षाचे विचार वाडी,वस्ती, तांड्यापर्यंत पोहचवले.सन.२०१९ ला माजलगाव मतदार संघाचा आमदार निवडून आनला.पक्ष फुटल्यानंतर ही निष्ठेने खा.शरदचंद्र पवार साहेबांच्या पक्षातच राहीलेले ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण करून जन सामान्यांच्या मनात घर केलेले प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे हे खा.शरद पवार यांच्या राष्ट्रवादी कॅांग्रेस कडून माजलगाव विधानसभा लढण्यास ईच्छूक होते.

मागे सन २०२१ ला छत्रपती संभाजी नगर पदवीधर मतदार संघात उमेदवारी मागणी केलेली होती,२०२४ ला बीड लोकसभा मतदार संघात जनसंपर्क वाढवून बीड लोकसभेच्या




उमेदवारीची मागणी केलेली होती.वरील दोन्ही वेळी मला पक्षाने आपला नंतर विचार करू असे सांगून थांबवले.आता सन २०२४ च्या माजलगाव विधानसभा निवडणूकीसाठी पक्षाकडे रितसर उमेदवारीची मागणी करून माजलगाव मतदार संघातील शंभर गावात जन संवाद दौरा करून पक्षाचे कार्य वाढवलेले आहे.माझ्या परिचय पत्राच्या पन्नास हजार प्रति मतदार संघातील सर्व गावांमध्ये वाटप केलेल्या आहेत.या वेळी माजलगाव मतदार संघात माझ्या विषयी मतदारांमध्ये सहानुभूती असून पक्षाने आपणास संधी द्यावी अशी जन भावना होती. या मुळे मी निश्चित निवडणूक जिंकू शकत होतो.परंतू असे न होता मला पक्षाने निवडणूक लढण्याची संधी व तिकीट दिले नाही. या मुळे मतदार संघातील जनता नाराज झालेली असून तुम्ही अपक्ष निवडणूक लढवावी आम्ही तुमच्या पाठीशी आहेत हा दबाव माझ्यावर वाढत असल्यामुळे मी माजलगाव विधानसभा मतदार संघ निवडणूक - २०२४ जनतेच्या विश्वासावर अपक्ष लढवून जिंकणार आहे असे सांगून प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांनी आज सोमवार दि.२८ ाक्टोबर २०२४ रोजी दुपारी १ वाजता आपला उमेदवारी अर्ज कोणताही गाजा वाजा न करता आई वडील दर्शन,गांजपूर येथील ग्राम दैवतांचे दर्शन घेऊन किल्ले धारूर येथील छत्रपती शिवाजी महाराज,डॅा.बाबासाहेब आंबेडकर,लोकनेते गोरीनाथराव मुंडे साहेब यांच्या चौकात अभिवादन करून साध्या पध्दतीने निवडणूक निर्णय अधिकारी माजलगाव यांचे कडे दाखल केला आहे.

## कारसेवक देशमुख बीड जिल्हाध्यक्ष भाजप प्रेसिडेंट हे सर्व मराठा . ?

बीड ।प्रतिनिधी

' आहे की नाही गंमत .. !!पक्ष याला चालवायचं असेल तर.. तर अशी जाती निहाय खेळी कराविच लागतीयं आहे , मान द्यायचा.. पण पाण ओढून घ्यायची पावर आपणाकडेच ठेवायची हि असली ' आतल्या गाठीची , खेळी प्रत्येक पक्षाला खेळावीच लागते त्याशिवाय गत्यंतरच नसतयं हे सर्व श्रूत ठरलेलं ' वेपन , झालं आहे ..! मागे परळी कर आर टी देशमुख पक्षाध्यक्ष होऊन गेलेत पूढे रमेश पोकळे पाटलाला पटेलकी बहाल करत अध्यक्ष करवून झालं.. पूढे सगळं ईल्ले ईल्ले .. !बीचार्या राजेंद्र मस्के यांनाही पाटीलकी शिवाय घतूराही देण्यात आले नाही.. ? ही वस्तुस्थिती आज तागायत वाढवून ठेवलूली आहे..आता आष्टीतलं एका शाळेतलं मास्तरांच्या माथी हे ' अध्यक्ष , पद देण्यात आलंचे आहे, खरेतर या पदाला शोभेल ऐसा मास्टर ब्लास्टर अध्यक्ष होने पक्षाला शोभले अस्ते मग तो जगदीश गूरखूदे असो की दु सर्जेराव तांदळे.. पंतु धेयधेवड्यांना पक्षात किमंत नस्ते हेच या निवढीनं सिध्द केलयं असेही कार्यकर्ते आज बोलत आहे. विस विस वर्ष यांनी पक्षाला पाणी भरायचं आणि देण्याचा मलीदा ईतरांना वाटप करायचा. !

परंतु शंकर दैशमुख यांचे नाव पूढे आलेने धोंडेचे सस्थेतील एक शिक्षक असलेने भाजप अनेक निष्ठावंताना मोठाच धक्का बसला आहे याचा सर्वात जास्त झटका येत्या विधानसभा निवडणुकीत दिसून येणारं. असेही एका भाजप कार्यकर्त्याने नाव न सांगण्याच्या अटीवर बोलून दाखवले... ! तो म्हणाला खरे + खंदे समर्थक जिल्ह्यातील अस्तित्वात अस्तांना एका कोचाळीतलं नवखं संघ कार्यकर्ता घ्यचाच होता तर.. तर जिल्ह्यात ढिग भर धडाडीचे जांबाज संघ कार्यकर्ता होते.? पण त्यांना डावलून ही खेळी खेळली जाते हे अ संयुक्त आहे .!

विधानसभा निवडणुकीत समोरच आहे.. ??

## दिपवाली उत्सवानिमित्त प्रशासनाने विविध सेवा उपलब्ध करून द्याव्यात:- अनिल बोर्डे

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई शहरातील नागरिकांना निवेदनानुसार तात्काळ विविध सेवा उपलब्ध करून देण्यात याव्यात अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी निवेदनानुसार मा. तहसीलदार गेवराई व मा. मुख्याधिकारी नगरपरिषद गेवराई यांच्याकडे केलेली आहे. दिपवाली उत्सवानिमित्त ग्राहकाकडून हॉटेलमधील खाद्यपदार्थाची मोठ्या प्रमाणात मागणी होत असल्यामुळे यामध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ होण्याची शक्यता असते. तरी याबाबत भेसळयुक्त व निकृष्ट दर्जाचे पदार्थ विक्री होणार नाही याबाबत प्रशासनाने जागृत राहून कार्यवाही करणे अपेक्षित आहे जेणेकरून गेवराई शहरातील नागरिकाच्या आरोग्यास अपाय होणार नाही. दिपवालीच्या कालावधीमध्ये गेवराई शहरातील व ग्रामीण भागातील वीज पुरवठा वारंवार खंडित केला जातो तरी दिनांक ३१-१०-२४ ते ५-११-२४ पर्यंत महाराष्ट्र राज्य वितरण मंडळाकडून नियमितपणे वीज पुरवठा करण्याच्या सूचना तात्काळ देणे आवश्यक आहे जेणेकरून दिपवाली उत्सवाच्या कालावधीमध्ये वीजपुरवठा खंडित होणार नाही याची दक्षता घ्यावी. गेवराई शहरात दिपवाळी निमित्त माळी गल्ली ते कोल्हेर रोड पर्यंत मोठ्या प्रमाणात गर्दी होऊन ग्राहकांना महिला ग्राहकांना जेष्ठ नागरिकांना चालणे कठीण होते याप्रकरणी शासनाने उपाययोजना करणे आवश्यक आहे. ज्यामुळे दिवाळीच्या काळात कायदा व सुव्यवस्था योग्य प्रकारे राहील याची खबरदारी प्रशासनाने तात्काळ घ्यावी. तरी या निवेदनावर तात्काळ कार्यवाही करून सहकार्य करावे अशी विनंती करण्यात येत आहे. अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष अनिल बोर्डे गेवराई ग्राहक पंचायत अध्यक्ष प्रा. भानुदास फलके, एडवोकेट बी एम मुळे आदींनी केली आहे.

## भाजपचे देगलूर बिलोली विधानसभेची उमेदवार जितेश अंतापुरकर आज भरणार उमेदवारी अर्ज

देगलूर । प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाने आज जाहीर केलेल्या उमेदवारांच्या तिसऱ्या यादीत विद्यमान आ. जितेश अंतापूरकर यांना देगलूर -बिलोली विधानसभा मतदारसंघाची उमेदवारी जाहीर केली आहे. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचे निकटवर्तीय मानले जाणारे आ. जितेश अंतापूरकरांनी लोकसभा निवडणुकीत काँग्रेस उमेदवारांचा प्रचार केला नव्हता. काही दिवसांपूर्वी आ.अंतापूरकर यांनी देगलूर-बिलोली विधानसभा सदस्यत्वाचा व काँग्रेस पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा देवून भाजपात प्रवेश केला होता. विधानसभा निवडणुकीच्या भाजप उमेदवारांची तिसरी यादी आज जाहीर करण्यात आली. त्यामध्ये आ. जितेश अंतापूरकर यांना देगलूर - बिलोली विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी



देण्यात आली आहे. या मतदारसंघातून दोन दिवसापूर्वी काँग्रेस व महाविकास आघाडीकडून निवृत्ती कांबळे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. आता देगलूर- बिलोली मतदारसंघातून तिरंगी लढत होण्याची चिन्हे आहेत. व आपल्या सर्व कार्यकर्त्यांसमवेत दिनांक २९. १०.२०२४, रोजी आपला उमेदवारी अर्ज भरणार आहेत.

## देगलूर विधानसभेसाठी ९४० कर्मचाऱ्यांना

# प्रशिक्षण दांडी मारणाऱ्या ५४ जणांना नोटीस

देगलूर ।प्रतिनिधी

देगलूर, लोकसभा पोटनिवडणूक व देगलूर - बिलोली विधानसभा मतदारसंघाच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने शहरातील देगलूर महाविद्यालयात एकूण ९९३ केंद्राध्यक्ष व सहाय्यक मतदान अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण दि. २६ ऑक्टोंबर शनिवार रोजी पार पडले. या प्रशिक्षणाला दांडी मारणाऱ्या एका क्षेत्रीय अधिकाऱ्यांसह ५४ कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येणार आहे. लोकसभेची पोटनिवडणूक व विधानसभेची निवडणूक एकाच वेळी होत आहे. निवडणूक कार्यक्रमाच्या रूपरेषेप्रमाणे मतदान केंद्राध्यक्ष व इतर कर्मचाऱ्यांचे पहिले प्रशिक्षण २६ व २७ ऑक्टोबर रोजी देगलूर महाविद्यालयात आयोजित करण्यात आले होते. पहिल्या दिवशी शनिवारी (ता२६) निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती क्रांती डोंबे,सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार भरत सूर्यवंशी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा बिलोली तहसीलदार गजानन शिंदे, नायब तहसीलदार आर. जी. चव्हाण, नायब तहसीलदार गिरीश सर्कलवाड, नायब तहसीलदार बालाजी मिठेवाड, नायब तहसीलदार अनिल परळीकर, नायब तहसीलदार दीपक मरळे, नायब तहसीलदार सतीश पुदाके, नायब तहसीलदार एस. एस. मामीलवाड, देगलूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शेखर देशमुख, बिलोली गटशिक्षणाधिकारी बालाजी पाटील, देगलूर गटविकास अधिकारी दिगंबर तोटरे, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी हमीद दौलताबादी यांच्या उपस्थितीत पार पडली.

# समाजातील शेतकरी, शेतमजूर, व्यापारी, दीनदलित, ऊसतोड कामगारांसाठी अहोरात्र काम करत आहे

## दहा वर्षानंतर पुन्हा सेवेच्या संधीची अपेक्षा आहे...सुरेश धस यांचे मतदारांना भावनिक आवाहन

आष्टी (प्रतिनिधी)

राजकारणात प्रवेश केल्यानंतर जामगावचा सरपंच आणि जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष झाल्यावर समाजातील सर्व घटकांना बरोबर घेऊन काम केल्यामुळे जनता जनार्दनाने १९९९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये मला आमदार केले. सन २०१४ च्या निवडणुकीमध्ये काही चुका झाल्यामुळे पराभव झाला तरीही शेतकरी, शेतमजूर, व्यापारी, हमाल, मापाडी, ऊसतोड कामगार दीनदुबळे, वंचित समाज यांना बरोबर घेऊन अहोरात्र काम करत आहे.

विधान परिषदेमध्ये मध्यंतरी काम केले परंतु विधानसभा सदस्य म्हणून गेली दहा वर्ष काम करण्यास संधी मिळालेली नाही ही संधी आपण आशीर्वाद दिल्यास पुन्हा मिळणार आहे त्यामुळे आष्टी विधानसभा मतदारसंघातील जनतेने सेवेची संधी द्यावी असे भावनिक आवाहन भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार) आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) या महायुतीचे उमेदवार माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी केले.आष्टी विधानसभा मतदारसंघांमध्ये उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर झालेल्या जाहीर सभेमध्ये प्रमुख मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

ते म्हणाले, राजकारणाची सुरुवात करतानाच सर्वसामान्यांच्या जीवनामध्ये चांगले दिवस यावेत हाच उद्देश ठेवून आपण राजकारणात आलो असून महाविद्यालयीन जीवनानंतर सरपंच पदी काम करताना शासकीय कामकाज कसे करावे ? लक्षात आले आणि त्यानंतर हरिनारायण जिल्हा परिषद गटातून राज्यात विक्रमी मताने विजयी झालो. स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या आशीर्वादाने जिल्हा परिषदेचा उपाध्यक्षपदी काम करण्याची संधी मिळाली आणि त्यातूनच गोरगरीब शेतकरी शेतमजूर यांच्या आशीर्वादामुळे आमदार झालो. आपण जनतेचे सेवक असल्यामुळे ही सेवा अहोरात्र म्हणजे वर्षाचे ३६५ दिवस आणि २४ तास करणे हा कर्तव्याचा भाग असतो. रात्री अपरात्री संकट काळात जनतेच्या मदतीला धावून जाणे हे लोकप्रतिनिधींचे कर्तव्य असते. माझा फोन माझ्या उशी जवळ असतो. मी कधीही फोन बंद ठेवत नाही. त्यामुळे जनतेच्या सतत संपर्कात असतो. पहिल्या विधानसभा निवडणुकीमध्ये ६६ हजार दुसऱ्या निवडणुकीमध्ये ९३ हजार आणि सन २०१४ च्या निवडणुकीमध्ये १ लाख १९ हजार मते घेऊन देखील पराभूत व्हावे लागले हे दु:ख आजही मनाशी बाळगून आहे. मध्यंतरी विधान परिषदेचा सदस्य म्हणून काम केले परंतु विधानसभा सदस्य नसल्यामुळे गेली १० वर्षापासून तालुक्यातील शेतकरी, शेतमजूर, हमाल, मापाडी, व्यापारी, विद्यार्थी यांच्यासाठी अत्यंत कमी काम झाले असून मतदारसंघातील जनतेला याचा त्रास सोसावा लागला आहे. मी जिल्हा परिषद मध्ये काम करत असताना सर्वसामान्य शेतकरी शेतमजुरांची मुले महागडे इंग्रजी शिक्षण घेऊ शकत नाही हे लक्षात घेऊन जिल्हा परिषदेचे शिक्षण दर्जेदार करण्याचा प्रयत्न केला त्याचा परिणाम म्हणून आज अनेक गावोगावी जिल्हा परिषद शिक्षण घेतलेले विद्यार्थी चांगल्या पद्धतीने कार्यरत आहेत. आपण शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले त्यापैकी जुन्या तलावातील गाळ काढणे, गावोगावी पिण्याच्या पाण्याच्या योजना मंजूर केल्या आहेत. आष्टी तालुक्यातील क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड पाटोदा तालुक्यातील महासांगवी येथील आई साहेब संस्थान अश्वलिंग पिंपळवंडी देवस्थान तसेच इतर अनेक देवस्थानांचा विकास केला आहे.




राज्यमंत्री म्हणून दीड वर्षाचा कालावधी मिळाला परंतु त्याच कालावधीमध्ये आष्टी पाडताना शिरूर तालुक्यातील फळबागा मोठ्या प्रमाणावर लागवडी करण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिल्यामुळे संत्रा उत्पादन वाढ झाली असून त्यामुळे शेतकऱ्यांना चांगला फायदा झाला आहे शेतकऱ्यांचे जीवनमान सतत उंचावत जावे यासाठी आपला प्रयत्न असतो असे सांगून ते म्हणाले मागील दहा वर्षांमध्ये आष्टी विधानसभा मतदारसंघांमध्ये सिंदफणा तलावाची उंची वाढवणे, माळेवाडी, रोहतवाडी, ठोंबळ सांगवी, खुंटेफळ साठवण तलाव ही कामे गतीने मार्गे लागली नाहीत तर काही ठप्प आहेत पहिल्या विधानसभा सदस्यांच्या काळामध्येच आपण सीना ते मेहेकरी पाणी सोडणे हा प्रकल्प सुरू व्हावा यासाठी प्रयत्न केले याचे ९७ टक्के काम मीच केले परंतु २०१४ ला पराभव झाला आणि राहिलेले काम तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निधी मंजूर केला आणि योजना सुरू झाली परंतु याचे श्रेय दुसरेच घेत आहेत अशी टिप्पणी करून ते म्हणाले की आता निवडणूक आल्यानंतर काहीजण हालचाल करू लागले आहेत मध्यंतरीच्या कोरोना कालावधीमध्ये आणि बिबट्याच्या दहशतीच्या वातावरणामध्ये आजी-माजी लोकप्रतिनिधी घरात बसून होते आता निवडणूक आल्यानंतर त्यांना लोकांना भेटण्याचे आठवण आली आहे असे सांगून शेतकरी दूध उत्पादकांसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाच रुपये प्रति लिटर प्रमाणे अनुदान जाहीर केले. तसेच कांद्याचे भाव पडल्यामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान पाहून साडेतीनशे रुपये प्रतिक्विंटल अनुदान याच शासनाने मंजूर केले असल्यामुळे तालुक्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना २१ कोटी ७५लाख रुपये अनुदान मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न केला असून आपण स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्यासोबत काम केले असल्यामुळे त्यांचे शिकवणीतून सर्वसामान्य जनतेसाठी कसे काम करायचे याचे धडे घेतलेले असून वर्षभर अभ्यास करणारा विद्यार्थी परीक्षेला घाबरत नाही त्याप्रमाणे मी निवडणुकीला घाबरत नाही मात्र परीक्षेमध्ये एक्सलंट कामगिरी गुणवंत विद्यार्थी म्हणून ७५ टक्के पेक्षा मार्क मिळवायचा माझा प्रयत्न सुरू असून या निवडणुकीमध्ये चांगले यश मिळावी यासाठी आपण मला मार्क देण्याची आवश्यकता आहे तालुक्यातील जनतेचे प्रेम माझ्या कुटुंबीयांना सतत मिळाले आहे याचे कारण म्हणजे आम्ही माझे मोठे बंधू देविदास धस पुतण्या मुलगा जयदत्त धस सागर धस असे आम्ही संपूर्ण कुटुंबीय लोकांच्या सुखदु:खात सहभागी असल्यामुळे लोकांचे आभार प्रेम आमच्या कुटुंबीयांना मिळत आहे आणि ती यापुढे मिळत राहणार आहे असा विश्वास असून गोरगरीब जनतेला केलेल्या आर्थिक मदतीचा कुठलाही हिशोब मी ठेवलेला नाही आणि ठेवणार पण नाही ऊसतोड कामगारांना उद्देशून बोलताना ते म्हणाले की ऊस तोडणी कामगारांचे जीवनातील जीव घेणे कष्ट आणि त्यांची सुखदु:ख मी जवळून पाहिले असून पंकजाताई मुंडे साहेब यांच्या नेतृत्वाखाली मागील वर्षी आपण ३४ टक्के दरवाढ घेतलेली आहे यावर्षी देखील मतदान झाल्यानंतरच ऊस तोडणी साठी जावे असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी शेवटी केले.

यावेळी यशवंत खंडागळे, लालासाहेब शिंदे, रमजान तांबोळी, जब्बार पठाण, सुरेश उगलमुगले, महेंद्र गर्जे, शार्दूल भणगे, सलीम जहांगीर, सुखदेव सानप, अभिजित शेंडगे, रंगनाथ धोंडे, विष्णुपंत चव्हाण, अनुजा गळगटे आदी मान्यवरांचे समोचित भाषणे झाली.

# आता निवडणुकीतून माघार नाही – माजी आ. भीमराव धोंडे

आष्टी (प्रतिनिधी)

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत मी पराभूत झालो असलो तरी मला एक लाखापेक्षा जास्त मते मिळाली होती त्याचवेळी भाजपा पक्षश्रेष्ठींनी सांगितले होते की, तुमचे काम चालू ठेवा पुढच्या वेळी तुम्हाला उमेदवारी दिली जाईल. परंतु मला उमेदवारी दिलेली नाही त्यामुळे मी अपक्ष निवडणूक लढवणार असून आता निवडणुकीतून माघार घेणार नाही असे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी कडा येथे मीडियांशी संवाद साधताना सांगितले.



याबाबत अधिक माहिती अशी की, आष्टी – पाटोदा – शिरूर विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पार्टी महायुतीची उमेदवारी कोणाला मिळते याकडे संपूर्ण बीड जिल्ह्याचे लक्ष लागले होते. माजी आमदार सुरेश धस यांना सोमवारी उमेदवारी जाहीर झाली, त्यानंतर कडा येथे मीडियाशी संवाद साधताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले की २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत माजी आ. सुरेश धस यांनी माझ्यासोबत राहून विरोधात काम केले. त्यामुळे मला पराभवाला सामोरे जावे लागले आता मी त्यांच्या सोबत राहुन त्यांचे काम कसे करु. त्यावेळी महाराष्ट्रात पराभूत उमेदवारांमध्ये एक लाखाहून अधिक मते मिळालेली भाजपाचे फक्त तीन उमेदवार होते. पक्षश्रेष्ठींनी मला त्याचवेळी सांगितल्याप्रमाणे मी पाच वर्षे लोकांच्या संपर्कात राहून काम केले परंतु मला उमेदवारी दिली नाही. पाच वर्षे लोकांच्या संपर्कात आहे. चार महिन्यापासून मतदार संघात फिरत आहे. मतदारसंघातील वाडी वस्ती पिंजून काढली आहे. मतदारसंघाच्या विकासासाठी आणि लोकाग्रहास्तव मी अपक्ष निवडणुकीत उतरलो असुन आता माघार घेणार नाही. २०१४ ते २०१९ या काळात मी मतदारसंघातील रस्ते विकासाबरोबरच इतरही प्रचंड विकास कामे केलेली आहेत आणि या निवडणुकीत माझा विजय निश्चित आहे असा विश्वास माजी आ. भीमराव धोंडे यांनी व्यक्त केला.

# शरद पवारांच्या राष्ट्रवादीची चौथी यादी जाहीर; सात उमेदवारांची घोषणा, कोणाला कुठून मिळाली संधी ?

गडब/सुरेश म्हात्रे

विधानसभेची निवडणूक (इलेक्शन- २०२४) जाहीर झाल्यानंतर अनेक राजकीय घडामोडी घडत आहेत. विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडी, महायुती, तसेच इतर पक्षांकडूनही उमेदवारांच्या याद्या जाहीर करण्यात येत आहेत. आता आज (२८ ऑक्टोबर) राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाची चौथी यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत ७ जणांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे.राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाकडून एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर यादी



प्रसिद्ध करण्यात आली आहे. यामध्ये माण मतदारसंघासाठी प्रभाकर घार्गे, काटोल-सलील अनिल देशमुख, खानापूर-वैभव पाटील, वाई-अरुणादेवी पिसाळ, दौंड-रमेश थोरात, पुसद- शरद मेंद, सिंदखेडा-संदीप बेडसे यांच्या नावाचा समावेश आहे. दरम्यान, शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून याआधी तीन याद्या जाहीर करण्यात आल्या आहेत.



# डॉ.योगेश क्षीरसागरांचा उमेदवारी अर्ज दाखल

## बीडमध्ये आयोजित बैठकीला मेळाव्याचे स्वरूप

**प्रतिनिधी** । बीड

युवा नेते डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांनी शहरातील संपर्क कार्यालयात आज १ वाजता तातडीची बैठक बोलावली आहे. त्यांच्या बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले होते. त्यांनी आज मुहूर्त चांगला असल्याने उमेदवारी अर्ज दाखल करत आहे. महायुतीचा बीडच्या जागेचा निर्णय झालेला नसून अजूनही अपेक्षा आहेत. परंतु, आपण भरलेला उमेदवारी अर्ज काढण्यासाठी नसेल, अशा शब्दात डॉ.योगेश क्षीरसागर यांनी निवडणूक लढविणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

महायुतीकडून बीडच्या जागेचा तिढा अध्यक्ष सुटलेला नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून इच्छुक असलेले डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बैठक बोलावून उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा निर्णय जाहीर केला. तातडीने बोलावलेल्या बैठकीला मेळाव्याचे स्वरूप आले होते. योगेशभैय्या आता निर्णय घ्या, माघार घेऊच नका, अशा शब्दात पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी भावना व्यक्त केल्या. डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, बीडवासियांनी अनेकांना संधी दिल्या. क्षीरसागर कुटुंबातील माझ्या वडीलासंह अनेकांना संधी मिळाली. एकदा मला संधी देऊन बघा. मला विकासाच्या मुद्द्यावर निवडणूक लढवायची आहे, जातीपातीच्या राजकारणात मला पडायचे नाही. मी २४ तास जनतेच्या दरबारात आहे. मोठ्या अपेक्षेने कामे घेऊन सर्वसामान्य लोक आपल्याकडे येतात. लोकांची सेवा करतानाच पक्षाचा प्रत्येक आदेश पाळून पक्ष संघटन केले. प्रत्येक बूथ, गल्ली, वॉर्डात पक्ष पोहचविला. प्रत्येक बूथवर फक्त आपली यंत्रणा सक्षम आहे. जनतेच्या आशीर्वादाने निवडणुकीला सामोरे जाऊ, आपली ताकद दाखविण्याची वेळ आली आहे, असे डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले.

शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज भरणार

डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या बैठकीस आलेल्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी तत्काळ अर्ज भरा असा आग्रह धरला. त्यानंतर डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सौ.के.एस.के. महाविद्यालयापासून पायी चालत जाऊन तहसील कार्यालयात अर्ज दाखल केला. यावेळी तहसील कार्यालय परिसरात मोठी गर्दी झाली होती.

# जयदत्त अण्णांच्या समर्थकांची रॅली बघून विरोधकांचे धाबे दणाणले

## आपण स्वयंपूर्ण आहोत सर्वांनी साथ दिली तर हा डाव देखील जिंकता येईल-माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**प्रतिनिधी** । बीड

बढता बढता कारवा बन गया अशी परिस्थिती निर्माण झाली आहे, स्वर्गीय काकु नाना हे आपल्यासाठी शक्तीपीठ आहे आपण एवढा मोठा उत्स्फूर्त आणि उदंड प्रतिसाद दिला हे माझ्यासाठी खूप महत्त्वाचे आहे आता आपण स्वयंपूर्ण आहोत सर्वांनी साथ दिली तरच पुढचा डाव जिंकता येईल असे भावनिक आवाहन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले आहे

आज माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे आगमन होणार असल्याची माहिती मिळतात तरुण कार्यकर्त्यांनी पाडळसिंगी टोल नाक्यापासून ते बीड शहरापर्यंत भव्य मोटरसायकल रॅली काढून भव्य स्वागत केले २००० गाड्यांचा ताफा जेव्हा शहरातून जात होता तेव्हा माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर देखील भारावून गेले होते रस्त्यात ठीक ठिकाणी लोकांचा समुदाय त्यांच्या स्वागतासाठी उभा होता अनेक कार्यकर्त्यांनी ठिकठिकाणी तोफांची सलामी देत आपल्या लाडक्या नेत्याचे स्वागत केले स्वर्गीय काकू नाना यांच्या समाधीला अभिवादन केल्यानंतर माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी उपस्थित कार्यकर्त्यांची मनमोकळेपणाने संवाद साधला ते म्हणाले स्वर्गीय काकू नाना हे आपल्यासाठी शक्तीपीठ आहे आपला एवढा मोठा उत्स्फूर्त आणि उदंड प्रतिसाद मला प्रेरणा देणार आहे सगळ्याला फाटा देऊन स्वयंपूर्ण होत पुढे जातोय नातेगोते तुटतात काळाच्या ओघात दुरावा निर्माण होऊ लागला आहे सामाजिक वेन विस्कटू लागली आहे आपण आज मला मोठा प्रतिसाद दिला उतणार नाही मातणार नाही घेतला वासा टाकणार नाही हे मी आज सर्वांसमोर जाहीर करतो अनेक चढउतार अनेक वळणे बघितली अनेकांनी मला आग्रह केला आपण सहा महिन्यापासून आपल्या तयारीला लागलो आहोत वाट लावणारे पुढे येत आहेत पण वाट दाखवणारा असावा लागतो याची जाण आणि भान या मतदारसंघातील लोकांना आहे सगळा बाजार भरलाय डिजिटल सारेच दिसू लागले आहेत परंतु वस्तुस्थिती काय असा प्रश्न निर्माण होतो कोण कुणीकडे जातोय याचा शोध घेण्याची गरज निर्माण झाली आहे करता करविता परमेश्वर आहे नियती सर्वांचा हिशोब करत असते लोकशाहीत असेच आहे लोक संधी देऊन बघतात आपण आपला वसा आणि वारसा नुसार चालावं लागतं पण आज कुणाचा आदर्श घ्यावा असा कोणी आहे का असा प्रश्न आहे समरसतेचे वातावरण निर्माण झाले आहे लोकशाहीत कुठलातरी निर्णय घ्यावा लागतो आता आपण स्वयंपूर्ण आहोत सर्वांनी साथ दिली तर पुढचा डाव जिंकता येईल जात-पात बाजूला ठेवून आपण सर्वजण पुढे जाऊया आपला आरसा स्पष्ट आहे वास्तव






आणि वस्तुस्थिती सर्वांसमोर आहे आपण आपला अधिकार यासाठी वापरण्याची वेळ आली आहे २० तारखेला आपली ताकद दाखवावी लागेल मी सेवेचे व्रत घेतले आहे माझ्याकडून सेवा करून घेणे हे आपले काम आहे तुम्ही पोटतिडकीने बोलता तसे काम करा आपण वाट बघितली थांबलो देखील पण आपलं मूळ आपल्याला विसरता येणार नाही आपला विश्वासाचा धागा आहे तो कधीही तुटू देणार नाही माझ्या जागी आपणच आहात असे समजून तुम्ही चमत्कार करा उद्या दिनांक २९ तारखेला अर्ज भरणार आहोत हे निवडणूक भाग्यरेषा बनवणारी आहे आपल्याला जे साध्य करायचे यासाठी समर्थ साथ द्या लोकशक्ती हीच माझी शिदोरी आहे आता दिवाळी आहे फटाके तर वाजत असतात परंतु आपले फटाके हे विजयाचे फटाके वाजले पाहिजेत असा दृढ निश्चय करा असे आवाहन करून माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी उपस्थित जनसमुदायास भावनिक आवाहन केले यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे सर्व प्रमुख समर्थक कार्यकर्ते महिला तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते